# मेहता मराठी ग्रंथजगत

डिसेंबर, २०२१
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष एकविसावे
अंक बारावा

"आज पाण्याहून व्हावा जीव नितळ निर्मळ
आणि भरून वाहावी तुझ्या छायेशी ओंजळ."


शब्दव्रती **शान्ता शेळके**

जन्मशताब्दी वर्ष
१२ ऑक्टोबर, १९२२



## नवीन संहिता... नवा आशय...

**अ पिअरलेस एम्बेसिडर ऑफ द चेस, ६४ घरांचा राजा, विश्वनाथन आनंद... लहानग्या 'विशी'पासून ते पहिल्या आशियाई विश्वविजेत्याच्या जडणघडणीतील अनेक टप्पे उलगडत जाणारं, बुद्धिबळाच्या पटाइतकंच गुंतवून टाकणारं आत्मकथन...**




# माइंड मास्टर

लेखक
**विश्वनाथन आनंद**
अनुवाद
**दीपक कुळकर्णी**

पृष्ठसंख्या : २३२
किंमत : ₹३५०
पोस्टेज : ₹५०



Book Available

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ डिसेंबर २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक बारावा

**संपादक**

सुनील मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

योजना यादव, पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **साहित्यवार्ता** | **१०** |
| **प्रकाशन** | **१३** |
| **पुरस्कार** | **१४** |
| **श्रद्धांजली** | **१७** |
| **एक एक पान घडताना...** | **२०** |
| **पुस्तक परिचय** | |
| आंबी | २६ |
| कृष्णकन्या | ३० |
| बेंजामिन ग्रॅहम | ३४ |
| द कटआऊट गर्ल | ४० |
| ते एकाकी लढले | ४४ |
| **अभिप्राय** | **५२** |
| **दिनविशेष** | **६१** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

## संपादकीय



# मागे वळून पाहताना...

गतवर्षी संपूर्ण जगात थैमान घातलेल्या कोरोनाचं सावट याही वर्षावर होतंच. पहिली लाट ओसरते ना ओसरते तोच दुसरी लाट आली. बेड, ऑक्सिजन, व्हेंटिलेटरसाठीची मारामार पुन्हा सुरू झाली. त्यामुळे सुरुवातीच्या सहा महिन्यांवर टाळेबंदीचा मोठा परिणाम झाला. 'मेहता मराठी ग्रंथजगत'ची कल्पना सर्वप्रथम ज्यांना सुचली, ज्यांच्या मार्गदर्शनाखाली हे मासिक प्रकाशित केलं जायचं, अशा श्री. शंकर सारडा यांचं दुःखद निधन याच काळात झालं. सारडा सरांनी आखून दिलेल्या मार्गावरच मासिकाची वाटचाल सुरू असताना सरांची आठवण वेळोवेळी येत राहते. मराठी माणसाला सदैव हसवत ठेवणारे आमच्या परिवारातील ज्येष्ठ आणि श्रेष्ठ लेखक द. मा. मिरासदार ऑक्टोबर महिन्यात काळाच्या पडद्याआड गेले.

२०२१हे संपूर्ण वर्ष मेहता पब्लिशिंग हाऊससाठी अनेक अंगांनी महत्त्वपूर्ण होतं. या वर्षाच्या सुरुवातीलाच आपल्यातर्फे प्रकाशित झालेल्या एका पुस्तकाने मोठा विक्रम केला. महाराष्ट्राचे पोलीस सहआयुक्त विश्वास नांगरे पाटील यांच्या 'कर हर मैदान फ़तेह' या प्रेरणादायी पुस्तकाच्या एका महिन्यात तीन आवृत्त्या निघून १२,५०० प्रतींची विक्रमी नोंद झाली. वाचकांचा भरघोस प्रतिसाद मिळणारं हे पुस्तक आता लवकरच हिंदी आणि इंग्रजीतही

प्रकाशित होणार आहे. यासोबतच अजून एक आनंदाची गोष्ट म्हणजे आपले लेखक आणि ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांची 'संभाजी' ही गाजलेली कादंबरी ॲमेझोनच्या एका वेस्टलॅन्ड कंपनीने इंग्रजीत प्रकाशित केली आहे.

गेल्या वर्षी संपूर्ण लॉकडाउनच्या नियमांमुळे कुठेही पुस्तक प्रदर्शनं भरवता आली नव्हती; पण या वर्षी पुस्तकं आणि वाचकांची ही भेट आम्ही घडवून आणली. सातारा, लातूर, तुळजापूर आणि बार्शी या चार शहरांमध्ये पुस्तक महोत्सव भरवण्यात आला. या निमित्ताने वाचकांच्या उदंड प्रतिसादात पुस्तक खरेदीची परंपरा जोपासली गेली. फेब्रुवारी महिन्यात ज्येष्ठ लेखिका अरुंधती रॉय पुणे दौऱ्यावर आल्या असताना मेहता पब्लिशिंग हाऊसचे प्रमुख अखिल मेहता यांनी त्यांच्याशी स्नेहभेट घेतली. या वेळी त्यांच्या पुस्तकांचे मराठी अनुवाद आणि मराठी वाचकांनी त्यांच्या लिखाणावर केलेल्या प्रेमाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आपल्या प्रकाशन संस्थेचे संस्थापक श्री. अनिल मेहता यांनी वयाच्या ८१व्या वर्षात पदार्पण केले. मराठी प्रकाशन व्यवसायात अनुवादाची वाट रुळवण्यापासून नव्या प्रभावी तंत्रज्ञानाची ओळख घडविण्यापर्यंत महत्त्वाच्या भूमिका निभावणाऱ्या श्री. मेहता यांच्या वाढदिवसानिमित्त ३ मार्च रोजी कोल्हापूर येथील कुरनूर येथे ८० लेखकांच्या नावे ८० वृक्षांचं रोपण करण्यात आलं.

दरवर्षी आपण सर्वजण ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत असतो तो क्षण म्हणजे आपलं वार्षिक ग्रंथप्रदर्शन. या वर्षी दि. १ ते १० ऑक्टोबर या काळात हे पुस्तकप्रदर्शन पार पडलं. या पुस्तक प्रकाशनाचं उद्‌घाटन पुस्तकभिशी चालवून एक आगळीवेगळी वाचन चळवळ चालवणाऱ्या सौ. रुपाली सोनावणे यांच्या हस्ते करण्यात आलं. कोरोनामुळे पुस्तकविक्रीला आलेली मरगळ दूर करताना मेहता पब्लिशिंग हाऊसच्या दालनासह अन्य १८ वितरकांकडे हे प्रदर्शन दिमाखात सुरू होतं. वितरक आणि वाचकांच्या उदंड उत्साहामुळे या पुस्तक प्रदर्शनास लक्षणीय प्रतिसाद मिळाला. या कोरोना काळात आपण वेगवेगळ्या तऱ्हेचा संघर्ष अनुभवला. काहींनी दीड फुटांचं अंतर पाळता पाळता आपली जिवलग माणसं कायमची गमावली तर काहींच्या अस्तित्वावरच कायमचा प्रश्न उभा राहिला. मानवी जगण्याला कधीही न चुकलेला हाच संघर्ष केंद्रबिंदू मानून आम्ही या वर्षीच्या दिवाळी अंकाची मांडणी केली. या अंकाचं प्रकाशन दि. ६ ऑक्टोबर रोजी पुण्याचे महापौर. श्री. मुरलीधर मोहोळ आणि ज्येष्ठ साहित्यिक विश्वास पाटील यांच्या हस्ते झालं. याच वेळी वाचकांचा उदंड

प्रतिसाद लाभलेल्या आणि मराठी साहित्य वर्तुळात इतिहास निर्माण करणाऱ्या रणजित देसाई यांच्या ‘स्वामी’ या कादंबरीच्या ३८व्या आवृत्तीचं प्रकाशनदेखील दिमाखात करण्यात आलं.

या पूर्ण वर्षभरात विविध उपक्रमांबरोबरच आपल्याकडून अनेक पुस्तकंही प्रकाशित झाली. आगामी काळातही विविध विषयांवरची पुस्तकं आम्ही आपल्यासाठी घेऊन येत आहोत. ज्यामध्ये सदानंद कदम यांचं ‘सांगाती’, विश्वनाथन आनंद लिखित आणि दीपक कुळकर्णी अनुवादित ‘माइंड मास्टर’, ख्रिस मुनी लिखित आणि नारायण पै अनुवादित ‘द मिसिंग’, सॅम ख्रिस्टर यांचं आणि अशोक पाथरकर यांनी अनुवाद केलेले ‘द स्टोनहेंज लेगसी’, जेनी हेअर यांचं ‘सकारात्मक जगण्याचा सहज मार्ग’, डॉ. कॅरोल ओ’कॉनर यांचं ‘यशस्वी नेतृत्व’, फ्रान्सिस कूम्बस् यांचं ‘स्वयंप्रेरणेतून ध्येयपूर्तीकडे’, मार्क हेनन यांचं ‘गुरुकिल्ली स्मरणशक्तीची’ ही आणि अशी अनेक पुस्तकं आहेत.

वाचक आणि लेखक यांच्यातील दुवा सांधणारी दर्जेदार पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे नेहमीच प्रकाशित होत राहिली आहेत. या पुस्तकांच्या साथीने वर्षाचा शेवटच नाही तर प्रत्येक दिवस साजरा होवो, हीच आशा !

गेले अनेक महिने चर्चेत असलेलं ९४वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ३ ते ५ डिसेंबर दरम्यान यंदा नाशिक इथे पार पडलं. या संमेलनाच्या निमित्ताने गोदातीर साहित्यिक, प्रकाशक, वाचकांच्या उपस्थितीने गजबजला. परिसंवाद रंगले, पुस्तकांचे स्टॉल सजले.

यंदाचं वर्ष हे ज्या ज्येष्ठ कवयित्रीचं ‘जन्मशताब्दी वर्ष’ म्हणून साजरं केलं जातंय त्या शब्दव्रती शान्ता शेळके यांच्या काही ओळी आठवतात,

*दिन जे गेले, त्यांचे झाले गहनगूढ आभाळ*
*बगळे होऊन झुलू लागली शुभ्र क्षणांची माळ...*

सरत्या वर्षाच्या काठावर उभं राहून मागे वळून पाहताना शान्ताबाईंच्या या ओळी अतिशय समर्पक वाटतात. गेल्या वर्षभरात घडलेल्या घटना, नवे उपक्रम, प्रकाशित झालेली असंख्य पुस्तकं, यांच्या आठवणी म्हणजे शान्ता-बाईंच्या भाषेत शुभ्र क्षणांची माळच! ज्या क्षणांच्या बळावर येणाऱ्या नव्या वर्षाचं स्वागत मोठ्या उत्साहात होईल. आशेचे नवे किरण घेऊन येणारा काळ आपली वाट प्रकाशमान करो, हीच सदिच्छा आणि शुभेच्छा!



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**


मेहता पब्लिशिंग हाऊस
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
टी बुक क्लब
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
G Pay +91 94223 23039
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


Find us on
Facebook
https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon

GET IT ON Google Play

Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**




**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**



## ‘पुल’ अन् ‘दमां’च्या साहित्याचे रसिकांवर आजही गारूड

‘महाराष्ट्राचं लाडकं व्यक्तिमत्त्व पु. ल. देशपांडे आणि विनोदी साहित्यिक द. मा. मिरासदार हे दोघंही आनंदयात्री होते. दोघांच्याही विनोदाने कुणालाही घायाळ किंवा जखमी केलं नाही. निर्मळ, निखळ विनोदातून मराठी माणसांना रसरशीत जीवनदृष्टी देणाऱ्या या विनोदकारांच्या साहित्याचं गारूड आजही रसिकमनावर आहे,’ असं मत महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. मिलिंद जोशी यांनी व्यक्त केलं.

पु. ल. देशपांडे यांच्या जयंतीनिमित्त आणि विनोदकार द. मा. मिरासदार यांच्या स्मरणार्थ आयोजित दीपावली शब्दोत्सवात या दोन थोर लेखकांच्या विशेष साहित्यदालनाचं उद्‌घाटन प्रा. जोशी यांच्या हस्ते झालं, त्या वेळी ते बोलत होते. अक्षरधारा बुक गॅलरी आणि राजहंस प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. द. मा. मिरासदार यांच्या कन्या सुनेत्रा मंकणी, मेहता प्रकाशन संस्थेचे सुनील मेहता, प्रसाद मिरासदार, रमेश राठिवडेकर या वेळी उपस्थित होते. प्रा. जोशी म्हणाले, ‘उपहास, उपरोध आणि विडंबन यांचा सहज वापर करत ‘पुलं’नी मध्यमवर्गीयांच्या जगण्याची उलटतपासणी केली, तर ‘दमां’नी अस्सल ग्रामीण बाजाचा



विनोद मराठी कथेत आणून मराठी कथेचं आणि विनोदाचं वर्तुळ व्यापक केलं. लेखणी आणि वाणी या दोन्ही माध्यमांवर दोघांचंही प्रभुत्व होतं. त्यांनी कसदार विनोदी लेखन तर केलंच, तितक्याच प्रभावीपणे भाषणातून आणि कथाकथनातून तो विनोद लोकांपर्यंत पोहचवला. दोघांनीही मराठी माणसांना भरभरून आनंद दिला.'

प्रकाश पायगुडे यांनी सूत्रसंचालन केलं. रसिका राठीवडेकर यांनी आभार मानले.

## व्हॉट्स ॲप ग्रूपच्या माध्यमातून दररोज नवीन पुस्तकांचा परिचय!
## वाचनसंस्कृती जपण्यासाठी पुस्तकप्रेमींचे विधायक पाऊल

वाचनसंस्कृती जपून ती सामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी कोल्हापुरातील पुस्तकप्रेमींनी विधायक पाऊल उचलले आहे. सोशल मीडियावर व्हॉट्स ॲप ग्रूप स्थापन केला असून, त्याच्या माध्यमातून दररोज नवनवीन पुस्तकांचा परिचय करून दिला जात आहे.


पुस्तकप्रेमी व्हॉट्स ॲप समूहाची १४ जून, २०२० रोजी स्थापना झाली. सुरुवातीला केवळ सहा सदस्य होते. आज १६५ सदस्य संख्या झाली आहे. यात अमेरिका, ऑस्ट्रेलिया, दुबई, नायजेरिया यासह भारतातील छत्तीसगढ, कर्नाटक, गोवा व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांतील साहित्यिक, कवी, चित्रकार, भटकंती करणारे यांचा समावेश आहे. ग्रूपतर्फे गेल्या वर्षभरात ५१० पुस्तकांचा परिचय फेसबुक, व्हॉट्स ॲपच्या

माध्यमातून करून दिला आहे.

दररोज सकाळी एका पुस्तकाचे मुखपृष्ठ व त्याची माहिती सोशल मीडियावर अपलोड केली जाते. दुपारी त्या पुस्तकावर चर्चा होते. त्यानंतर रात्री उशिरापर्यंत साहित्याच्या अंगाने चर्चा सुरू राहते. समूहातील एका सदस्यावर सात दिवसांची जबाबदारी सोपविली जाते. प्रत्येक शनिवारी दुपारी काव्यसंध्येचे आयोजन केले जाते. आभासी स्वरूपातील दिवाळी अंकाचे प्रकाशन करण्यात आले. या वेळी पुस्तकप्रेमी ग्रूपचे अध्यक्ष कृष्णा दिवटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, 'वाचनसंस्कृती जपण्याचे अभियान हजारो लोकांपर्यंत पोहोचले असून, त्याचा वटवृक्ष झाला आहे. नववर्ष स्वागत विशेष अभियान राबविले जाणार आहे. चिपळूण, कोल्हापूर येथील महापूरग्रस्तांना आर्थिक, वस्तूस्वरूप मदत करण्यात आली. भविष्यात समूहातर्फे पुस्तक व साहित्यप्रेमींचे संमेलन घेण्याचा संकल्प आहे.' असे सांगितले.

◆

**नवी संहिता... नवा आशय...**




# खाकी फाइल्स

**नीरज कुमार**

माजी पोलीस आयुक्त, दिल्ली पोलीस

अनुवाद - **रोहन टिल्लू**

अंध:कारमय गुन्हेगारी अंतरंग आणि पोलिसी धैर्याची पराकाष्ठा यांचं मिश्रण असणाऱ्या, आयपीएस नीरज कुमार यांच्या कारकिर्दीतल्या अविस्मरणीय घटनांचा मागोवा

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## ‘अपूर्व, अलौकिक. एकमेव...’

यशोधरा काटकर लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे प्रकाशित ‘अपूर्व, अलौकिक, एकमेव...’ या पुस्तकाचं २६ नोव्हेंबर रोजी गोव्यातील पणजी येथे आयोजित ‘आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २०२१’ मध्ये प्रकाशन झालं. गोवा मनोरंजन संस्थेचे उपाध्यक्ष श्री. सुभाष फळदेसाई आणि गोमंतकीय साहित्यिक ज्योती कुंकळकर यांच्या हस्ते हा प्रकाशन समारंभ पार पडला.

कला, साहित्य क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्वांचा आढावा ‘अपूर्व, अलौकिक, एकमेव...’ या पुस्तकात घेण्यात आला आहे. लेखिका यशोधरा काटकर म्हणजे चित्रपट महर्षी भालजी पेंढारकर यांच्या नात. मराठी सिनेसृष्टीतील मातब्बर मंडळी, जसे की डॉक्टर घाणेकर, प्रिया तेंडुलकर, प्रशांत, गौरी दामले आणि राही अनिल बर्वे यांच्या सहवासात आलेले अनुभव, या प्रभावी व्यक्तिमत्त्वांचे अंतरंग आणि त्यांच्यातील संवादांनी जुळून आलेले धागे यशोधरा काटकर यांना ज्या तऱ्हेने आकळले ते त्यांनी आपल्या या पुस्तकात शब्दबद्ध केले आहेत.



## 'जालियनवाला बाग' कादंबरीस सूर्यांशचा सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्कार

चंद्रपूर- साहित्य क्षेत्रात प्रसिद्ध असलेले, साहित्य क्षेत्रात सन्मानाचे समजले जाणारे 'सूर्यांश साहित्य व सांस्कृतिक मंच चंद्रपूर-२०२०' चे राज्यस्तरीय वाङ्मय पुरस्कार नुकतेच प्रदान करण्यात आले. सूर्यांश संस्थेच्या वतीने मागील आठ वर्षांपासून पुरस्कार दिले जातात. याही वर्षी राज्यभरात प्रकाशित कथा, कविता, कादंबरी आणि बालसाहित्य या विविध साहित्यप्रकारांत संस्थेला आलेल्या प्रवेशिकांमधून निवड करून खालील साहित्यकृतींना २०२०चे साहित्य पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये कादंबरीसाठी देण्यात येणारा अशोकसिंह ठाकूर पुरस्कृत कादंबरी पुरस्कार मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या, अमेय जाधव (पालघर) यांच्या 'जालियनवाला बाग' या कादंबरीला प्रदान केला गेला. सन्मानचिन्ह, रोख रक्कम, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप असून, समारंभपूर्वक हे पुरस्कार प्रदान करण्यात आले.

## डॉ. न. म. जोशी आणि अनिल अवचट यांना 'मसाप'चा जीवनगौरव पुरस्कार

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. न. म. जोशी आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अनिल अवचट यांना अनुक्रमे २०१९ आणि २०२० चा 'मसाप जीवनगौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. डॉ. सुनीलकुमार लवटे (कोल्हापूर) आणि मोहन रेडगावकर (इंदूर) यांना भीमराव कुलकर्णी कार्यकर्ता पुरस्कार प्रदान करण्यात आला.

वार्षिक पुरस्कारांचे वितरण साहित्य परिषदेचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते २५ नोव्हेंबर रोजी मसापच्या माधवराव पटवर्धन सभागृहात करण्यात आले. कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे परिषदेचा मे महिन्यातील वर्धापनदिन सलग दोन वर्षे साजरा करता आला नव्हता.

राजा फडणीस पुरस्कृत उत्कृष्ट शाखा पुरस्कार 'मसाप'च्या डोंबिवली आणि चिपळूण शाखेला, रत्नाकर कुलकर्णी स्मरणार्थ 'मसाप कार्यकर्ता पुरस्कार' ॲड. जे. जे. कुलकर्णी आणि राजेंद्र मुठाणे यांना, रत्नाकर कुलकर्णी स्मरणार्थ 'मसाप शाखा कार्यकर्ता पुरस्कार' पुरुषोत्तम सदाफुले आणि अनघा कारखानीस यांना देण्यात आला.

## पद्म पुरस्कारांवर मराठीची मोहोर

दरवर्षीप्रमाणे यंदाही देशातील सर्वोच्च नागरी पुरस्कारांपैकी महत्त्वाचे मानले जाणारे पद्म पुरस्कार ८ नोव्हेंबर रोजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. गेल्या वर्षी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे हा पुरस्कार सोहळा झाला नाही. त्यामुळे या वर्षी दोन्ही वर्षांतील पुरस्कारार्थींचा सन्मान करण्यात आला. ज्यामध्ये यंदा सात मान्यवरांचा 'पद्म विभूषण', दहा मान्यवरांचा 'पद्मभूषण', १०२ जणांचा 'पद्मश्री' तर १६ मान्यवरांचा मरणोत्तर 'पद्म पुरस्कार' देऊन गौरव करण्यात आला.

विविध क्षेत्रांत नावलौकिक मिळवून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या सर्व पुरस्कार विजेत्यांमध्ये अनेक मराठी नावंही आहेत. ज्यांच्या कामाची महती सर्वदूर पसरली आणि या मानाच्या पुरस्कारांवर त्यांच्या कार्याचा ठसा उमटला. महाराष्ट्रातून ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना कला क्षेत्रात

भरीव कामगिरी केल्याबद्दल, तर अहमदनगर जिल्ह्यातील आदर्श गाव अशी ओळख असलेल्या हिवरे बाजार गावचे माजी सरपंच आणि सामाजिक कार्यकर्ते पोपटराव पवार यांनाही पद्मश्री पुरस्कार देण्यात आला. वैद्यकीय संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रमण गंगाखेडकर, तर गेल्या ४५ वर्षांपासून आदिवासी ठाकर समाजाच्या लोककलेचे जतन आणि प्रसार करणाऱ्या परशुराम आत्माराम गंगावणे यांनाही पद्मश्री पुरस्काराने गौरवित केलं गेलंय. १९९५मध्ये 'राघववेळ' या कादंबरीसाठी साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित केले गेलेले नामदेव चंद्रभान कांबळे यांना साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रात मोलाचे योगदान दिल्याबद्दल, तर आयुष्यभर पारधी समाजासाठी काम करणाऱ्या आणि त्याच उद्देशाने 'पुनरुत्थान समरसता गुरुकुल'ची स्थापना करणाऱ्या गिरीश प्रभुणे यांना पद्मश्री पुरस्कार दिला गेला. 'अनाथांची माय' म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या सिंधूताई सपकाळ यांनाही पद्मश्री पुरस्कार प्रदान करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. तसेच, गोव्याचे माजी मुख्यमंत्री आणि भारताचे माजी संरक्षणमंत्री मनोहर गोपालकृष्ण पर्रिकर यांना मरणोत्तर पद्मभूषण पुरस्कार दिला गेला.

या सर्व मराठी पुरस्कारार्थींचे मन:पूर्वक अभिनंदन!


**नवी संहिता... नवा आशय...**



**क्षशीर**

**सहना विजयकुमार**

अनुवाद - **उमा कुलकर्णी**

धगधगत्या काश्मीरचं अंतर्गत कोलाहल मांडणारी, सखोल अभ्यासांती लिहिलेली विलक्षण कादंबरी

**किंमत : ४२५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## द. मा. मिरासदार




मेहता पब्लिशिंग हाऊसच्या सूचीमध्ये ज्यांची जवळपास २५ पुस्तकं समाविष्ट आहेत, ते द.मा. मिरासदार ऑक्टोबरच्या दोन तारखेला हे जग सोडून गेले. 'द.मां.' सारखे लेखक फक्त लौकिकार्थाने हे जग सोडून जात असतात. त्यांची पुस्तकं आणि त्यातून होणारं निखळ मनोरंजन यातून हे साहित्यिक वाचकांच्या, रसिकांच्या मनात सदैव अजरामर असतात. विनोदबुद्धी शाबूत ठेवून लेखनातून सतत त्याचा आविष्कार घडवणं, हे सोपं काम नाही; पण 'द.मां.' नी हे काम आजन्म केलं. कथाकथनातून, पटकथालेखनातून, वगनाट्यातून, एकांकिका, ललित लेखन यातूनही त्यांनी मराठी माणसाला मनमुराद हसवलं.

मिरासदारांच्या विनोदाचा हा एक नमुना. (**कथासंग्रह : हसणावळ, कथा : तास कवितेचा**) मास्तर तंगड्या हलवीत म्हणाले, ''तो मुलगा असा तसा नाही लेकानो, मोठा शूर आहे. समोरच्या घोडेस्वाराला उद्देशून तो काय म्हणतोय ठाऊक आहे?

वाचा पहिली ओळ. 'खबरदार जर टांच

मारुनि जाल पुढे, चिंधड्या उडविन राई राई एवढ्या!' समजलं?''

थोडेसे समजले. थोडेसे समजले नाही; पण तसे म्हणायचे कसे? सरांनी 'खबरदार' हा शब्द इतक्या जोरात उच्चारला होता की आमच्या तरी कानठळ्याच बसायच्या राहिल्या होत्या.

''खबरदार जर टांच मारुनि जाल पुढे, चिंधड्या–''

बंडू जोशी उठून म्हणाला,

''सर, त्या घोड्यावरच्या माणसाचं नाव चिंधडे आहे?''

मास्तर पाय हलविता हलविता थांबले. त्यांनी एकदम भयंकर चेहरा केला. चित्रातल्या राक्षसासारखा. मला एकदम बंडूबद्दल भीतीच वाटली. वाटले की सर आता याचेच राईराईएवढे का कसलेसे तुकडे करणार बहुतेक.

मराठी माणसाला सतत हसवत ठेवणाऱ्या द.मा. मिरासदार यांना मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे व मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर तर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.

## द. मा. मिरासदार यांची आम्ही प्रकाशित केलेली साहित्यसंपदा

**कादंबरी**

नावेतील तीन प्रवासी

**कथासंग्रह**

जावईबापूंच्या गोष्टी
हुबेहूब
फुकट
सरमिसळ
गुदगुल्या
चुटक्याच्या गोष्टी
विरंगुळा
बेंडबाजा
गोष्टीच गोष्टी
भुताचा जन्म
खडे आणि ओरखडे
माकडमेवा
गप्पांगण
गंमतगोष्टी
हसणावळ
गप्पागोष्टी
माझ्या बापाची पेंड
भोकरवाडीतील रसवंतीगृह
चकाट्या
भोकरवाडीच्या गोष्टी

**ललित**

अंगतपंगत

**वगनाट्य**

मी लाडाची मैना तुमची

**विनोदी नाटिका**

गाणारा मुलूख

**एकांकिका संग्रह**

सुट्टी आणि इतर एकांकिका

## सुरेश वसंत नाईक



सुरेश वसंत नाईक यांचा जन्म १ एप्रिल, १९४०रोजी झाला. अनेक मासिके व वृत्तपत्रांमधून विविध विषयांवर त्यांनी लेखन केले. त्यांची 'या सुखांनो!' आणि 'कविता दोघांची' ही पुस्तके मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहेत.

मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे व मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर तर्फे श्री. सुरेश नाईक यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

## गुरुनाथ नाईक



आपल्या रहस्यकथांनी अवघ्या महाराष्ट्राला झपाटून टाकणारे आणि तब्बल बाराशे कादंबऱ्या लिहून रहस्यकथेच्या प्रांतात अढळ स्थान निर्माण करणारे 'रहस्यकथा'कार गुरुनाथ विष्णू नाईक यांचे पुण्यात निधन झाले.

१९७० ते १९८२ या काळात त्यांनी ७२४ रहस्य व गूढकथा लिहिल्या. यात सैनिकी जीवनावरील २५० शिलेदार कादंबऱ्या आणि गोलंदाज या काल्पनिक व्यक्तिरेखेभोवती फिरणाऱ्या १५० कथा लिहिल्या.

गूढ शैली आणि रंजकता या वैशिष्ट्यांमुळे त्यांच्या कादंबऱ्यांनी मराठी वाचकांना अक्षरश: खिळवून ठेवले. गुरुनाथ नाईक यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## बाबासाहेब पुरंदरे



प्रसिद्ध मराठी साहित्यिक, नाटककार, इतिहासकार आणि वक्ते बळवंत मोरेश्वर पुरंदरे ऊर्फ बाबासाहेब पुरंदरे यांचे १५ नोव्हेंबर रोजी पुण्यात निधन झाले. वयाच्या शंभराव्या वर्षी अखेरचा श्वास घेतलेल्या पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर १२ हजारांहून अधिक व्याख्याने दिली. 'जाणता राजा' या सुप्रसिद्ध नाटकाचे लेखन-दिग्दर्शन केले. 'पुरंदऱ्यांची दौलत,' 'पुरंदऱ्यांची नौबत,' गड-किल्ल्यांची ऐतिहासिक माहिती देणारे साहित्य (गडसंच), 'शेलारखिंड' आणि 'राजा शिवछत्रपती' हे बाबासाहेबांचे आजवर प्रकाशित झालेले साहित्य. पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित झालेल्या पुरंदरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## एक एक पान घडताना...

–अनिल मेहता



*मराठीतील ललित पुस्तकांच्या प्रकाशनापासून ते विविध भाषांतील गाजलेली पुस्तके मराठीत अनुवादित करण्यापर्यंतचा प्रवास हा जितका रंजक आहे तितकाच खडतरदेखील. पहिल्या अनुवादित पुस्तकापासून ते आजतागायत अनुवादित पुस्तकांनी मिळवलेल्या भरघोस यशाची गोष्ट श्री. अनिल मेहता यांनी या लेखातून उलगडून सांगितलीय.*

### ४. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चं अनुवादित पुस्तकांचं समृद्ध दालन

पुण्यात मेहता पब्लिशिंग हाऊस सुरू करण्याआधी मी कोल्हापुरातून काही अनुवादित पुस्तकंही प्रकाशित केली होती. पुण्यात संस्था सुरू झाल्यानंतर मात्र त्याला आणखी वेग आला. त्या पुस्तकांची यादी नंतर वाढत गेली, त्याची गोष्ट अशी -

दर महिन्याला अजब पुस्तकालयासाठी पुस्तक खरेदीसाठी मी नेहमी मुंबईला जात असे. तिथं यू. बी. एस. नावाची एक कंपनी होती. ते असं ठिकाण होतं, की तिथं सर्व प्रकारची इंग्रजी पुस्तकं मिळायची. मी ज्या ज्या वेळी मुंबईला

जायचो तेव्हा पहिल्यांदा यू. बी. एस.मध्ये जात असे. मी रेल्वेनं जात असे आणि स्टेशनवरून बाहेर आलो, की समोरच यू. बी. एस. कंपनीचं ऑफिस होतं. प्रथम तिथं जाऊन नवीन कोणती पुस्तकं आलेली आहेत ती बघायची, मला कोणती पुस्तकं हवी आहेत त्याच्या याद्या द्यायच्या, मग बाकी गोष्टी करायच्या, हे ठरलेलंच होतं.

बऱ्याचदा दिल्लीतही पुस्तक खरेदीसाठी मी जात असे, त्या वेळी आंतरराष्ट्रीय पुस्तकप्रदर्शन व पुस्तकजत्रा आवर्जून पाहत असे. तिथं मला समजलं, की भारतातील सर्व भाषिक प्रकाशकांची व प्रकाशक संघटनांची शिखर संस्था म्हणजे 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स' ही दिल्लीतच आहे. मी तिथंही जाऊ लागलो. या संस्थेचं सभासद असणं हे प्रतिष्ठा मिळवून देणारं आहे, हे समजल्यानंतर मी 'फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स'चं सभासदत्व घेतलं. त्याची वर्गणी जास्त होती; पण ते धाडस केलं. त्यामुळं दर महिन्याला मला त्यांची वार्तापत्रं येत असत. त्यातून मला प्रकाशन व्यवसायाशी संबंधित विषयावर प्रशिक्षणात्मक कार्यक्रम, कार्यशाळा व विविध उपयुक्त माहिती मिळत असे. मी तिथल्या कार्यशाळांना हजर राहू लागलो. त्यातून मला माझ्या प्रकाशन व्यवसायात वेगवेगळे प्रयोग करण्याची संधी मिळाली. प्रकाशकांची पुस्तकं भाषांतरासाठी मिळवता आली. त्या संस्थेचा त्या काळात मी पुण्यातला एकटाच सदस्य होतो, असं मला वाटतं. त्यामुळं भारतभरात प्रकाशन क्षेत्रात काय काय चालू आहे हे समजायचं. तिथल्या बऱ्याच प्रकाशकांशी माझ्या चांगल्या ओळखी झाल्या होत्या. ते स्वतःहून मला पुस्तकं पाठवत. 'विकले गेले तरच पैसे पाठवा' म्हणत.

वर्ल्ड बुक फेअर (जागतिक पुस्तक मेळावा)मध्ये मी आवर्जून जात असे. तिथं मला जगभरातील उत्तमोत्तम पुस्तकं पाहण्याचा नादच लागला होता. मी आमच्या पुस्तकांचं दालनही तिथं लावायचो. तिथं प्रकाशन क्षेत्रातील जगभरातील लोकांशी ओळखी होत. मला खूप काही शिकायची इच्छा असायची. तर देशात कुठल्या प्रकारची पुस्तकं प्रकाशित केली जातात, ती कशी प्रकाशित होतात, हा व्यवसाय कसा चालतो, त्यात काय काय अडचणी येतात, त्या कशा सोडवल्या जातात हे सर्व जाणून घेण्याची ओढ असायची. मी प्रकाशकांना भरपूर प्रश्न विचारायचो, माहिती घ्यायचो, ओळखी वाढवायचो. माझं ज्ञान शक्य तितकं अद्ययावत करायचो. त्यातून

मराठी पुस्तकं कुठं कुठं घेतली जातात, इतर भाषांतील पुस्तकांचे हक्क कसे मिळवायचे हे मला समजत गेलं आणि आपोआपच मनात विचार येऊ लागला की, आपण मराठी ललित पुस्तकं तर प्रकाशित करतो आहोतच. मग जगभरातील उत्तमोत्तम पुस्तकंही मराठीत अनुवाद करून घेऊन तीही मराठी वाचकांपर्यंत का पोहोचवू नयेत? मराठी वाचकांना आणखी नवे विषय नव्या आशयासह समजतील. आतापर्यंत आपण या क्षेत्रात नवनवे प्रयोग करतच आलो आहोत तर हाही एक करून पाहूया. आपल्या बाजूनं उत्तम, गुणवत्तापूर्ण काम करायचे. बस्स! यश मिळेल न मिळेल. एखादं पुस्तक करून तर बघूया.

आणि मी त्या दृष्टीनं अनुवादासाठी पुस्तक शोधू लागलो.

यू.बी.एस. कंपनीनं  विकास पब्लिशिंग ही नवी प्रकाशन संस्था सुरू केली होती. एकदा मी मुंबईत यू.बी.एस.मध्ये गेलो तेव्हा तिथल्या मॅनेजरनं मला थांबवून घेतलं. ते म्हणाले की, 'आमचे मालक सी.एम.चावला हे दिल्लीहून मुंबईला येताहेत. पंधरा-वीस मिनटांतच ते एअरपोर्टवरून आपल्या ऑफिसवर येतील. तुमची व त्यांची ओळख व्हावी अशी माझी इच्छा आहे. तुम्ही थांबा.' मी थांबलो. ते आले. मॅनेजरनं सी. एम. चावला यांच्याशी ओळख करून दिली. त्या वेळी त्यांनी मला मराठी पुस्तकांबद्दल बरेच प्रश्न विचारले.

सी.एम.चावला म्हणाले,  'तुम्ही मराठी पुस्तकं प्रकाशित करताहात, तर भाषांतरं कधी केली आहेत का?'

मी म्हटलं, 'नाही.'

तर ते म्हणाले, 'तुम्ही अजित वाडेकर यांचं 'My Cricketing Years' हे पुस्तक मराठीत करणार असाल तर मी त्याचे हक्क तुम्हाला देतो.'

त्या वेळी भारतीय आंतरराष्ट्रीय लोकप्रिय खेळाडू व कप्तान असलेले अजित वाडेकर यांचं 'My Cricketing Years' हे पुस्तक अतिशय गाजत होतं. खेळातील त्यांच्या उत्तम कामगिरीसाठी म्हणून त्यांना अर्जुन पुरस्कार, पद्मश्री पुरस्कार असे मोठमोठे सन्मान प्राप्त झालेले होते. १९७१मध्ये वेस्ट इंडिज आणि इंग्लंडमधील कसोटी मालिकांमध्ये त्यांनी ऐतिहासिक विजयाची नोंद केलेली होती. मी त्यांचं ते आत्मचरित्रपर पुस्तक वाचलं होतं.

मी विचारलं, 'यात तुम्हाला मानधन किती द्यायचं?'

ते म्हणाले, ‘पाचशे रुपये फक्त.’

मी लगेच तयार झालो. कोल्हापुरात येऊन पुढच्या कामाला लागलो. त्या काळात खिळे जुळवून प्रिंटिंग करण्याची पद्धत होती. बाइंडिंग करायला खूप वेळ लागत होता. छपाई, मुखपृष्ठ सगळं कोल्हापुरातील बाबा चौधरी यांच्याकडून करून घेतलं आणि १९७३मध्ये अजित वाडेकरांचं ‘क्रिकेटच्या मैदानावर मी’ हे पहिलं अनुवादित पुस्तक मी प्रकाशित केलं. अनुवादक होते, माधव मोर्डेकर.

त्या काळात माझ्या अंदाजानं त्या पुस्तकाच्या पुणे व मुंबईत जवळजवळ सात ते आठ हजार प्रती विकल्या गेल्या होत्या आणि तरीही पुस्तकाची मागणी वाढत होती. माझ्यासाठी हा अनुभव अतिशय मोलाचा ठरला. माझा उत्साह द्विगुणित झाला. या निमित्तानं विकास पब्लिशिंगचे प्रकाशक मि. चावला यांच्याशी माझी चांगली ओळख झाली. दिल्लीला गेलो, की ते मला कायम भेटायला बोलवत. नरेंद्र कुमार म्हणून तिथले मुख्य संपादक होते. त्यांच्याशीही माझी चांगली मैत्री झाली. कोणत्या पुस्तकावर त्यांचं काम चालू आहे, हे मला त्यांच्याकडून समजायचं. त्यांच्या काही पुस्तकांचे हक्क मी घेऊ लागलो.

आणीबाणीच्या काळानंतर इंदिरा गांधींवर बरीच पुस्तकं येऊ लागली होती आणि त्यातली काही पुस्तकं नरेंद्र कुमारांनी मला मुद्दामहून पाठवून दिली. ‘या पुस्तकांचा अनुवाद तूच मराठीत आण.’ असा त्यांनी मला प्रस्ताव दिला. तो मी स्वीकारला; कारण ती पुस्तकं नक्कीच जाणार याची मला खात्री होती. ती पुस्तकं आम्ही प्रकाशित केली.

‘इंदिरा गांधींची दोन रूपे’, ‘इंदिरा गांधींची सत्ताभिलाषा’ ही दोन्ही पुस्तकं त्या वेळी खूप गाजली. त्यानंतर कुलदीप  नय्यर यांचं ‘द जजमेंट’ हे पुस्तक विकास प्रकाशननं काढलं होतं, तेही त्यांनी आम्हाला कळवलं. ताबडतोब तेही पुस्तक आम्ही मराठीत प्रकाशित केलं. त्यानंतर ‘फ्रीडम ॲट मिडनाइट’ नावाचं एक पुस्तक आलं. इंग्रजीतून भारतात प्रसिद्ध झालेलं ते असं पुस्तक होतं, की ज्याच्या एक लाख प्रती वर्षात विकल्या गेल्या होत्या. मी त्या पुस्तकाची जाहिरात केली की, हे पुस्तक लवकरच मराठीतून येत आहे व त्या वेळेप्रमाणे प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी आठ की दहा रुपये असं नोंदणीमूल्य ठेवलं; पण ती बातमी समजताच नथुराम गोडसे यांच्या भावानं

केस केली. त्यात नथुराम गोडसे व स्वा. सावरकर यांच्याबद्दल काही वाईट उल्लेख होते. आम्हाला पुस्तकाचे प्रकाशन थांबवावे लागले. मला त्या काळात प्रचंड त्रास झाला. दर आठवड्याला मुंबई - पुणे जाणे, वकिलांसोबतच्या चर्चा, कोर्टकचेरी असं सगळं तीन-चार महिने चाललं आणि मग आमची त्या केसमधून मुक्तता झाली. पुस्तक प्रकाशित केलं. आठ हजार प्रतींचं बुकिंग झालं होतं. आजही या पुस्तकाला मागणी आहे. जर ही केस झाली नसती तर या पुस्तकाच्या किमान पंधरा ते वीस हजार प्रतींचं बुकिंग झालं असतं.

ही पुस्तकं चांगली गेली, याचं कारण मला असं वाटतं, की आपल्याकडं वाचकांना राजकारणावरील पुस्तकांच्या वाचनाची आवड आहे. शिवाय, त्या काळात आणीबाणीमुळं एकंदरीतच वातावरण ढवळून निघालं होतं. राजकारणाकडं बघण्याचा स्वतंत्र दृष्टिकोन तयार होत होता. लोकांचा राजकीय घटनांमधील रस वाढलेला होता. त्यांना राजकीय पटलामागील घटना जाणून घ्यायच्या होत्या. त्यामुळं ही पुस्तकं अतिशय चांगल्या प्रमाणात विकली गेली.

तर, अशा प्रकारे विकास पब्लिशिंगची पुस्तकं आम्ही मराठीत प्रकाशित करायची, असं आमचं ठरूनच गेलेलं होतं. कोल्हापुरात माधव मोर्डेकर हे एक चांगले अनुवादक मला मिळाले होते. त्यांच्याकडून मी अनेक महत्त्वपूर्ण पुस्तकं अनुवादित करून घेतली. त्या काळात ती खूप चांगली गेली. माधव मोर्डेकर हे मेहता पब्लिशिंग हाऊससाठी काम करणारे पहिले अनुवादक होते.

त्यानंतर पुण्यात मेहता पब्लिशिंग हाऊस सुरू झालं. आठ-दहा वर्षांनी माझा मुलगा सुनील या क्षेत्रात आला. त्यानंतर अनुवादित पुस्तकांची संख्या वाढत गेली. अंजनी नरवणे, अपर्णा वेलणकर, लीना सोहोनी, सुप्रिया वकील, रवींद्र गुर्जर,आशा कर्दळे यांसारखे उत्तमोत्तम अनुवादक मिळत गेले. पाश्चात्त्य साहित्यविश्वातील अनेक मान्यवरांची इंग्रजी पुस्तकं मराठीत प्रसिद्ध केली. तसेच, हिंदी, गुजराती, कन्नड, बंगाली, उडिया या इतर भारतीय भाषांतील पुस्तकांचा आम्ही मराठीतून अनुवाद केला. केवळ इंग्लंड-अमेरिकेतील गाजणारी किंवा थ्रिलर्स निवडली नाहीत. भारतात प्रकाशित होणाऱ्या इंग्रजी पुस्तकांकडंही लक्ष दिलं. अरुण शौरी, किरण बेदी, तसलिमा नासरिन, नानी पालखीवाला, अरुंधती रॉय, शोभा डे, सुधा मूर्ती


यांच्यासारख्या भारतीय पातळीवर मान्यता असलेल्या अनेक लेखकांचे साहित्य अनुवादासाठी म्हणून संपर्क साधून मिळवले. त्यामुळं या लेखकांच्या ललितेतर पुस्तकांतील विचार मराठी वाचकांपर्यंत पोहोचू शकले. त्यांना महाराष्ट्रात आणून, त्यांच्या भाषणांचं आयोजन करून, त्यांची मराठी वाचकाला प्रत्यक्ष ओळखही करून दिली. त्यांना ऐकणं ही वाचक वर्गासाठी सुवर्णसंधी होती. अशा प्रकारचं काम त्या वेळी मराठी प्रकाशन क्षेत्रात प्रथमच घडत होतं. इतक्या मोठ्या व्यक्तींच्या व्याख्यानांमुळं मराठी प्रकाशनात मेहता पब्लिशिंग हाऊसचं नाव आपोआपच मोठं होत होतं.

त्या काळात मराठीव्यतिरिक्त इतर कुठल्याही भाषेत इतक्या प्रमाणात पुस्तकं अनुवादित होत नव्हती. हिंदीत होत; पण तीही फार कमी. पुढं पुढं तर आमच्याकडं अनुवादित पुस्तकांचीच संख्या वाढत गेली व 'मेहता पब्लिशिंग हाऊस'चं अनुवादित पुस्तकांचं एक समृद्ध दालन तयार झालं. 'मेहता पब्लिशिंग हाऊस' अनुवादित पुस्तकांसाठी ओळखलं जाऊ लागलं.

या अनुवादित पुस्तकांचं वैशिष्ट्य म्हणजे वाचकांना त्याच त्या विषयांपलीकडं जाऊन नवीन काहीतरी या पुस्तकांतून वाचायला मिळतं. त्यांचं अनुभवविश्व त्यातून समृद्ध होतं. आणि याचं हेच कारण होतं की अमूक एक पुस्तक जाणार म्हणजे जाणार, असं मला आधीच लक्षात यायचं. पुस्तक निवडण्याची माझी पद्धत म्हणजे आधी मी ते मूळ पुस्तक संपूर्ण चाळतो, स्वतः वाचतो. त्याशिवाय निर्णय घेत नसे. 'नॉट विदाऊट माय डॉटर' हे पुस्तक माझ्या हाती आलं, तेव्हाही मी ते नेहमीप्रमाणं चाळलं अन् चाळताचाळताच लक्षात आलं, की हे पूर्ण वाचलं पाहिजे. मी ते झपाट्यानं वाचून काढलं अन् मला वाटलं, की हे मराठीत आलंच पाहिजे. आणि मी लगेच सुनीलला सांगितलं, की 'या पुस्तकाचे मराठीसाठी हक्क घे' आणि लीना सोहोनींकडून अनुवाद करून घेतला. आज या पुस्तकाच्या नऊ-दहा आवृत्त्या संपल्या आहेत.

बऱ्याच प्रकाशकांना, लोकांना वाटतं, की पुस्तकं फारशी वाचली जात नाहीत वगैरे; पण मला वाटतं, की चांगली पुस्तकं ही वाचली जातातच. मला तर त्याची खात्रीच असते. फक्त पुस्तकांची योग्य पारख करता यायला हवी. उत्तम अनुवादक व संपादक मिळवता यायला हवा.

(क्रमशः)




# आंबी

**विश्वास पाटील**

*तुटलेलं माहेर आणि सुटलेलं सासर यामध्ये बांध घालणाऱ्या एका सौंदर्यवतीची काळजात कळ उठवणारी कहाणी...*
*वयाच्या सतराव्या वर्षी विश्वास पाटील यांनी लिहिलेली पहिली स्त्रीप्रधान कादंबरी*

'आंबी' ही आंबी नावाच्या तरुणीची जीवनकथा आहे. आंबी ही बाप्पाजींची मुलगी. मुळातच देखणी असलेली आंबी वयात आल्यावर आणखीच सुंदर दिसायला लागते. आंबी लहान असतानाच तिची आई वारल्यामुळे बाप्पाजींनी

तिला आई आणि बाप दोघांची माया दिली आहे. लहानपणापासून तिला रामायण, महाभारतातल्या, पुराणातल्या कथा सांगून स्त्रीने कसं संस्कारसंपन्न असावं, ही गोष्ट बाप्पाजींनी तिच्या मनावर ठसवलेली असते. आंबीचे काका गणूआप्पा आणि तिची राधाकाकू या दोघांचाही आंबीवर जीव असतो. तिची अनूमावशी आणि रामूकाकाही वर्षभरातून एकदा येऊन तिला भेटत असतात. बाप्पाजींचा घरात आणि गावातही खूप दबदबा असतो. त्यामुळे आंबी देखणी असूनही गावातील तरुण तिच्याकडे वाकड्या नजरेने बघू शकत नसतात. आंबी वयात आल्यावर बाप्पाजी तिच्या लग्नाचा प्रस्ताव त्यांच्या बहिणीसमोर, हिराक्कासमोर मांडतात. हिराक्काच्या मुलाला श्रीरंगला आंबी द्यायची, असं त्यांनी आंबीच्या जन्मापासूनच ठरवलेलं असतं. श्रीरंगच्या आणि आंबीच्या लग्नाचा प्रस्ताव बाप्पाजींनी मांडल्यावर हिराक्का त्या लग्नाला विरोध करते. श्रीरंग, आंबीच्या लायक नाही, असं ती बाप्पाजींना विनवून सांगते; पण बाप्पाजी ऐकत नाहीत आणि आंबीचं लग्न श्रीरंगशी लावून देतात.

लग्नानंतरच्या पहिल्याच रात्री श्रीरंगचं आंबीजवळ न येता, तिला घाबरून लांब राहणं आंबीला बुचकळ्यात टाकतं; नंतरही तो तिच्यापासून शक्यतो दूरच राहत असतो. काहीच दिवसांत आंबीच्या लक्षात येतं, तो नपुंसक आहे. ते कळल्यावर आंबीवर आभाळ कोसळतं. संसाराची तिने रंगवलेली सगळी स्वप्नं विरतात. ती रातोरात माहेरी निघून येते. अर्थातच तिच्याकडून श्रीरंगबद्दलची वस्तुस्थिती समजल्यावर बाप्पाजी, गणूआप्पा, राधाकाकू सगळेच हवालदिल होतात. सगळं घरच सैरभैर होऊन जातं. आंबीचं दुसरं लग्न करून द्यावं, असं रामूकाकांनी सुचवताच बाप्पाजी खूप संतापतात. त्यांच्यामते ते शहाण्णव कुळी असल्यामुळे मुलीचं दुसरं लग्न करणं म्हणजे कुळाला बट्टा लावण्यासारखं होतं. बाप्पाजींच्या हट्टापुढे कुणाचंच काही चालत नाही.

मनाने पार कोलमडलेली आंबी स्वत:ला कामांत बुडवून घेते; पण तिचं तारुण्य आणि सौंदर्य हा तिच्यासाठी शाप असतो. गावातला रंगा पैलवान तिचं लग्न होण्याच्या आधीपासून तिच्याशी लग्न करायचं स्वप्न पाहत असतो. आता आंबी परत आली आहे पाहिल्यावर एके दिवशी परत तो आंबीला शेतात गाठून तिच्याशी लग्न करायची इच्छा व्यक्त करतो. आंबी नकार देत असतानाही तो तिचा हात पकडतो आणि तिला खेचून स्वत:बरोबर न्यायला लागतो. आंबीचा आरडाओरडा ऐकल्यावर बाप्पाजी आणि गणूआप्पा धावत


येतात आणि रंगाला बेदम मारतात. मग रंगाची आई बाप्पाजींच्या घरी येऊन त्यांना वाट्टेल तसं बोलते. तिच्या बोलण्यामुळे आपली प्रतिष्ठाच धुळीला मिळाली, असं बाप्पाजींना वाटतं आणि ते गळफास लावून घ्यायचा प्रयत्न करतात. आंबी विष प्यायचा प्रयत्न करते; पण गणूआप्पा आणि राधाकाकू त्या दोघांना तसं करण्यापासून परावृत्त करतात. त्या प्रसंगापासून बाप्पाजी आंबीशी अबोला धरतात. एकदा गावातली एक मुलगी नांदायला जात नसते म्हणून गावचा पाटील या नात्याने त्या मुलीला बाप्पाजी समजवायला गेलेले असताना, ती मुलगी त्यांनाच सुनावते, की स्वत:च्या मुलीला घरात ठेवून घेतलंय, मग मला कशाला नांदायला जायला सांगता? ही गोष्टही बाप्पाजींच्या मनाला खूप लागते आणि ते गणूआप्पाला सांगतात, की आंबीला तिच्या सासरी सोडून ये.

बाप्पाजींच्या सांगण्यावरून गणूआप्पा आंबीला तिच्या सासरी सोडून येतात; पण श्रीरंग आंबीला मारहाण करायला लागतो. ती मारहाण असह्य होऊन आंबी माहेरी परत येते; पण बाप्पाजींचा अबोला कायम असतो. शेवटी तर ते म्हणतात, की एकतर आंबी या घरात राहील, नाहीतर मी राहीन. मग गणूआप्पा तिला अनूमावशीकडे नेऊन घालतो. काही दिवस गेल्यानंतर अनूमावशी तिचं लग्न तुकाराम नावाच्या ड्रायव्हरशी लावून देते. लग्नानंतर आंबीचे काही दिवस बरे जातात. नंतर तुकाराम तिला घेऊन मुंबईतल्या एका झोपडपट्टीत राहायला जातो. मग तुकाराम दारू पितो, जुगार खेळतो हे सगळं आंबीला समजतं. तुकाराम कामधंदा न करता तिला मारहाण करायला लागतो. शेजारी राहणारी मुमताज भाभी आणि तिचा नवरा उस्मान नेहमी आंबीला मदत करत असतात. तुकाराम तिला मारायला लागल्यावर उस्मान त्याला दम देतो. भाभी आंबीला स्वत:बरोबर बेकरीत कामाला घेऊन जायला लागते. तुकाराम तिच्या पगारातले पैसै काढून घेऊन तिला मारझोड करतच असतो. अशातच आंबीला दिवस जातात. तिला मुलगी होते. भाभी आणि उस्मान गावाला गेलेले असताना उसने पैसे फेडण्यासाठी तुकाराम आंबीची इज्जतच विकू पाहतो तेव्हा मात्र आंबी तिथून निसटते. मोखाड्याला आदिवासी मुलांच्या एका आश्रमात ती आश्रय घेते. बाप्पाजींना ती पत्र लिहिते; पण त्या पत्रावरून तिचा पत्ता मात्र बाप्पाजींना कळत नाही. एकदा पेपरात आलेली एक बातमी बाप्पाजींना आंबीपर्यंत घेऊन जाते. काय असते ती बातमी? आंबीचं पुढे काय होतं?

**नवी संहिता... नवा आशय...**

TBC-30 Book No. 4

थरारकथातल्या पुरुष नायकांचं वर्चस्व मोडीत काढणारी डर्बी मॅकोर्मिक लावतेय, शहारे आणणाऱ्या प्रकरणाचा छडा...
कंठ गोठवणारी थरारकथा...





# द मिसिंग

**ख्रिस मुनी** । अनुवाद : **नारायण पै**

**किंमत : ३५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत । पोस्टेज ५०/-रु.**

TBC-30 Book No. 5

माणसांचा बळी देणारा गूढ पंथ... त्यातीलच एका शास्त्रज्ञाची आत्महत्या... त्या जाळ्यात फसलेली युवती... एक रहस्यमय, थरारनाट्य




# द स्टोनहेंज लेगसी

**सॅम ख्रिस्टर** । अनुवाद : **अशोक पाथरकर**

**किंमत : ४५०/-रु. । TBCच्या सभासदांना निम्म्या किमतीत । पोस्टेज ५०/-रु.**




# कृष्णाकन्या

**रत्नाकर मतकरी**

*रत्नाकर मतकरी यांचा परीसस्पर्श लाभलेल्या अनोख्या कथा...*

रत्नाकर मतकरी यांच्या 'कृष्णकन्या' या कथासंग्रहात एकूण नऊ कथा आहेत.

**कृष्णकन्या :** एका तरुणाच्या प्रथमपुरुषी निवेदनातून ही कथा साकारते. नोकरी करून कॉलेज शिक्षण घेणारा हा तरुण अभ्यासासाठी रोज कॉलेजच्या लायब्ररीत जात असतो. एकदा तिथे त्याला कृष्णकन्या नावाची मुलगी भेटते.

तिच्याशी ओळख झाल्यावर त्याला समजतं की ती कथा-कविता लिहिते. तिच्या खूप आजारी असलेल्या भावाला हा तरुण डॉ. गुप्तांकडे घेऊन जातो आणि त्याचे प्राण वाचवतो. त्यावेळी तिचे वडील या तरुणाचे आभार मानतात. या प्रसंगानंतर कृष्णकन्या त्याला भेटतच नाही. बरेच दिवस वाट पाहून तो तिच्या घरी जायचं ठरवतो. प्रत्यक्षात जेव्हा तो तिच्या घराचा रस्ता शोधायला लागतो, तेव्हा त्याला तिचं घरच काय, पण आसपासची एकही खूण दिसत नाही. त्याबद्दल तो डॉ. गुप्तांशी बोलतो. काही दिवसांनी गुप्तांच्या हाती कृष्णकन्याने लिहिलेलं आत्मचरित्र लागतं. ते जवळजवळ साठ वर्षांपूर्वी लिहिलेलं असतं आणि त्यात या तरुणाचा (कथानिवेदकाचा) उल्लेख तिने केलेला असतो. तो तरुण चांगलाच चक्रावतो. त्यानंतर परत एकदा रात्रीच्या वेळी आपोआप त्याची बाइक कृष्णकन्येच्या घराकडे खेचली जाते. आणि...

**हुलकावणी :** जयवंत हा इन्शुरन्स कंपनीत एक्झिक्युटिव्ह असतो. तो आठ वर्षांचा असताना एकदा त्याच्या डोळ्यांसमोर असं दृश्य तरळून जातं, की त्याचे वडील रोजच्याप्रमाणे अंघोळीसाठी विहिरीत उतरले आहेत आणि एकदम सगळं पाणी लाल झालंय; पण त्याबद्दल वडिलांजवळ बोलण्याचं धैर्य त्याला होत नाही; मात्र दुसऱ्या दिवशी अंघोळीसाठी विहिरीत उतरलेल्या त्याच्या वडिलांचं डोकं विहिरीतील दगडावर आपटतं आणि ते मरण पावतात. म्हणजे वडिलांच्या मृत्यूची पूर्वसूचना जयवंतला मिळालेली असते. पूर्वसूचना मिळूनही आपण वडिलांना सावध केलं नाही, ही खंत जयवंतला सतावत राहते. या घटनेनंतर तीस वर्षांनी संपत नावाच्या एका माणसाच्या अपघाती मृत्यूची पूर्वसूचना जयवंतला मिळते. संपत मंत्रालयात असिस्टंट चीफ सेक्रेटरी असतात. संपतच्या गाडी नंबरवरून जयवंत त्यांचा पत्ता शोधतो आणि त्यांना सावध करतो. त्यामुळे संपत यांचं अपघाती मरण टळतं. मुख्यमंत्र्यांची त्यांच्या वाढदिवशी गोळ्या घालून हत्या झाली आहे, असं दृश्य जयवंतच्या नजरेसमोर तरळून जातं आणि त्याविषयी तो संपत यांना सांगतो. प्रत्यक्षात मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवशी त्यांच्यावर गोळ्या झाडल्या जातात; पण ते वाचतात. तिसऱ्या वेळेला जयवंतला कुणाच्या मृत्यूची पूर्वसूचना मिळते?

**दुष्ट गोष्ट :** रिया आणि सुनाम एकाच वर्गात शिकत असतात. एकाच कॉलनीत राहत असतात. रियाला सुनामच्या हुशारीविषयी असूया असते.

एकदा सुनामला वर्गात अचानक ताप भरतो, त्यातून तो बरा होतो; पण नंतर एक दिवस फुटबॉल खेळत असताना त्याला रक्ताची उलटी होते आणि तो बेशुद्ध पडतो. सुनामला हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात येतं; त्याच्या सगळ्या तपासण्या होतात; पण रिपोर्ट्स नॉर्मल असून आणि उपचार सुरू असतानाही दोन-तीन दिवसांत सुनामचा मृत्यू होतो. सुनामच्या शाळेतील शिक्षिका बर्वे मॅडम सुनामच्या आईला सांगतात की, रिया चेटकी आहे. तिच्यामुळे सुनामचा मृत्यू झाला. खरंच रिया चेटकी असते की अन्य कुणामुळे सुनामचा मृत्यू झालेला असतो?

**अ-संवाद :** सुयश हा तरुण एका जाहिरात कंपनीत व्हिज्युअलायजर म्हणून काम करत असतो. त्याच्या पत्नीचा, नेहाचा अचानक मृत्यू होतो. पत्नीच्या मृत्यूनंतर सहाव्या दिवशी तो ऑफिसला चाललेला असताना रस्त्यावरच्या गर्दीतून एक स्त्री त्याला खुणावत असलेली त्याला दिसते. तो तिच्याजवळ पोचतो तेव्हा ती म्हणते, ‘‘मला तुम्हाला काही सांगायचंय.’’ तिला काय सांगायचंय हे ऐकण्यासाठी तो दोन पावलं पुढे होतो, तेवढ्यात मध्ये कुणीतरी येतं आणि ती नाहीशी होते. त्यानंतर तीन-चार वेळा ‘ती’ त्याला दिसते आणि काही न बोलता रहस्यमय रीतीने नाहीशी होते. कोण असते ती? सुयशच्या दिवंगत पत्नीशी तिचा काही संबंध असतो का?

**लपाछपी :** एका लहान मुलाच्या प्रथमपुरुषी निवेदनातून ही कथा पुढे सरकते. त्याचं नाव विल्कू. या विल्कूमध्ये छोटा विल्कू आणि मोठा विल्कू अशी दोन व्यक्तिमत्त्वं वावरत असतात. मोठा विल्कू दादागिरी करणारा, तर छोटा विल्कू घाबरट. हा जो मूळ विल्कू असतो त्याची आई त्याला जन्म देऊन लगेच वारलेली असते. त्यामुळे त्याच्या वडिलांना, अण्णांना त्याचा राग येत असतो. त्यामुळे विल्कू आजीकडे शहाडला राहत असतो. आजीच्या घराजवळ राहणारा राघव शाळेत हुशार असतो आणि त्याची त्याला फार घमेंड असते. त्याची खोड मोडायची असं मोठा विल्कू ठरवतो. एकदा नेहमीप्रमाणे विल्कूकडे लपाछपी खेळायला आलेल्या राघवला मोठा विल्कू युक्तीने अडगळीच्या खोलीतल्या लाकडी पेटीत बंद करतो. पुढे काय होतं?

**आईवेगळा** : ही कथा ‘लपाछपी’ या कथेचा सीक्वल आहे. आजीच्या मृत्यूनंतर अण्णा, विल्कूला मुंबईला घेऊन येतात. अर्थातच त्याच्याबरोबर मोठा विल्कू आणि छोटा विल्कू असतातच. मुंबईला विल्कूची सावत्र आई असते आणि सावत्र भाऊ असतो मल्ली. सावत्र आई विल्कूला प्रेमाने वागवत


असते; पण मल्ली मात्र विल्कूशी फटकून वागत असतो. नेहमीप्रमाणे मोठा विल्कू ठरवतो, मल्लीचा काटा काढायचा. काय होतं पुढे?

**पहिला थांबा :** एका निर्जन बसस्टॉपवर तीन माणसं आहेत. तरुण, लुकडा आणि प्रस्थ. खरं तर ते परस्परांना ओळखत नाहीत तरी त्यांना एकमेकांना पाहिल्यासारखं वाटतंय. तरुण आणि लुकड्याची प्रस्थला भीती वाटते. तेही प्रस्थला मारू पाहतात. खरं तर एकमेकांना ओळखत नसलेल्या लोकांमध्ये लगेच अशा भावना कशा निर्माण झाल्या? आभासी वातावरणातील गूढकथा.

**भाऊ :** सदावर्ते हा समाजसेवक दंगलग्रस्तांच्या कॅम्पमध्ये मदत करत असतो. तिथे सगळे मुसलमान असतात. सदावर्तेंच्या हट्टाखातर एक डॉक्टर थोडासा वेळ तेथील रुग्णांसाठी द्यायला तयार होतात. डॉक्टरांच्या हाताखाली काम करणारा शिरू नावाचा मुलगा त्या कॅम्पवर औषधं पोचवण्याचं काम करत असतो. कॅम्पवर असलेल्या हनीफ नावाच्या मुलाशी त्याची चांगली मैत्री होते; पण अक्रम नावाच्या मुलाला ही मैत्री आवडत नाही; कारण त्याच्या सगळ्या कुटुंबाला हिंदूंनी जाळून मारलेलं असतं. त्यामुळे शिरूबद्दल त्याच्या मनात प्रचंड चीड असते. एकदा तो शिरूला बेदम मारहाण करतो; पण त्याच अक्रमला शिरू एका भयंकर प्रसंगातून वाचवतो.

**छोटी बहू :** विराज हा 'बॉम्बे एक्स्प्रेस' या वृत्तपत्रात काम करणारा पत्रकार. गौतम शाहू या दिवंगत दिग्दर्शकाच्या जीवनाचे वैयक्तिक पैलू जाणून घेण्याच्या निमित्ताने गौतमच्या पत्नीशी शांतीदेवीशी विराजचा परिचय होतो. शांतीदेवींनी पार्श्वगायिका म्हणून एक काळ गाजवलेला असतो. गौतम आणि शांती एकत्र राहत नसतात. शांती आपल्या मुलीसह, राणीसह राहत असते आणि गौतम एकटा राहत असतो; पण गौतमच्या आत्महत्येनंतर शांती कोसळते. दारूच्या आहारी जाते. गायिका म्हणूनही तिची कारकीर्द थांबते. एकेकाळची ही प्रथितयश गायिका अज्ञातवासात गेलेली असते. विराज शांतीदेवींचा चाहता असतो. प्रथम त्याला भेटायलाही नकार देणाऱ्या शांतीची नंतर विराजशी चांगली मैत्री होते. दारू सोडणे, परत माणसांत येणे आणि एक गायिका म्हणून परत स्वत:चं स्थान मिळवणे, या तीन गोष्टी शांतीला करायच्या असतात. त्यासाठी ती स्वत:शी खूप झगडते. त्या झगड्यात ती यशस्वी होते का?

## पुस्तक परिचय




# बेंजामिन ग्रॅहॅम

वॉरन बफेला गुंतवणुकीचा मंत्र देणारा गुरू

**अतुल कहाते**

*शेअर बाजारात अभूतपूर्व यश मिळवणाऱ्या वॉरन बफेच्या गुरूची विलक्षण यशोगाथा*

काही काळापूर्वी वॉरन बफे हा अमेरिकी गुंतवणूकदार जगातला दुसऱ्या क्रमांकाचा सगळ्यात श्रीमंत माणूस म्हणून ओळखला जात असे. त्यानंतर त्यानं आपल्या संपत्तीच्या ९० टक्के हिस्सा सामाजिक कार्यासाठी दान करण्याचा निर्णय घेतला आणि श्रीमंतीच्या या शर्यतीतून तो बाहेर पडला. अशा या वॉरन बफेनं स्वत: कित्येकदा आपल्या यशामागचं

सगळ्यात प्रमुख कारण म्हणजे आपला गुंतवणुकीच्या विश्वातला गुरू बेंजामिन ग्रॅहॅम असल्याचं सांगितलं आहे. बफेविषयी लिहिणाऱ्या प्रत्येक माणसानं बेंजामिन ग्रॅहॅमचा उल्लेख केल्याचंही आपल्याला आढळेल. वॉरन बफे हा गुंतवणुकीच्या जगातला सगळ्यात यशस्वी माणूस म्हणून ओळखला जातो. अशा बफेचा गुरू म्हणून जो माणूस ओळखला जात असेल, त्या माणसाचं कौशल्य काय असेल याचा नुसता विचार करूनही आपल्याला चक्रावल्यासारखं होईल!

आपल्या नेहमीच्या खुमासदार शैलीत बोलताना बफेनं एकदा 'ग्रॅहॅमचं लिखाण वाचून कुणी गरीब तरी नक्कीच झालेलं नाही' असं म्हटलं होतं! अर्थातच, ग्रॅहॅमचं लिखाण वाचून त्यानुसार आपल्या गुंतवणुकीचा मार्ग आखणाऱ्या लोकांचं भलंच झालेलं आहे; असं बफेला म्हणायचं होतं. ग्रॅहॅमचं निधन होऊन आता कित्येक दशकं झालेली असली, तरी त्याच्या गुंतवणुकीच्या तंत्रावर आधारित असलेल्या असंख्य गुंतवणूक योजना जगभरात अब्जावधी रुपयांची उलाढाल करत असतात. ग्रॅहॅमनं लिहिलेल्या 'सिक्युरिटी ॲनॅलिसिस' आणि 'द इंटेलिजंट इन्व्हेस्टर' या पुस्तकांच्या लाखो प्रती खपूनसुद्धा ही पुस्तकं आजही 'बेस्टसेलर' म्हणून ढिगानं खपतात. त्याच्या 'सिक्युरिटी ॲनॅलिसिस' पुस्तकाचा उल्लेख आपल्याला गाजलेल्या 'The Pursuit of Happiness' या गाजलेल्या चित्रपटात आढळतो. विल स्मिथनं रंगवलेल्या ख्रिस गार्डनर नावाच्या अजरामर पात्राला आपल्या हलाखीच्या परिस्थितीतून बाहेर येण्यासाठी एका गुंतवणुकीसंबंधीच्या कंपनीत नोकरी हवी असते. त्यासाठीच्या चाचणी परीक्षेची तयारी करताना गार्डनर ग्रॅहॅमच्या याच पुस्तकाचा आधार घेतो. ग्रॅहॅमच्या संकल्पना म्हणूनच अजिबात कालबाह्य झालेल्या नाहीत आणि विसाव्या दशकामध्ये त्यानं उभ्या केलेल्या तंत्राचे गोडवे लोक एकविसाव्या शतकाचा जवळपास एक चतुर्थांश भाग संपायच्या जवळ असूनसुद्धा विसरू शकत नाहीत. १९१४ मध्ये ज्याची कारकीर्द सुरू झाली आणि १९५६ मध्ये ती संपली अशा ग्रॅहॅमचं हे यश थक्क करून सोडणारं आहे. इतर बहुतेक क्षेत्रांमध्ये विलक्षण यश मिळवणारे लोक नंतर हळूहळू विस्मरणात जायला लागतात किंवा काळाच्या मागे पडतात. बेंजामिन ग्रॅहॅम मात्र गुंतवणुकीच्या विश्वातला जणू ध्रुवताराच असल्यासारखा भरभक्कमपणे उभा आहे. त्याचा चेला वॉरन बफे त्याच्याहून कैकपटींनी श्रीमंत झालेला असला,

तरी तो सतत आपल्या गुरूचं गुणगान गात राहिलेला आहे.

बेंजामिन ग्रॅहॅमनं 'व्हॅल्यू इन्व्हेस्टिंग' म्हणून ओळखली जाणारी गुंतवणुकीची पद्धत तयार केली. आता जगभरातले असंख्य गुंतवणूक तज्ज्ञ, निधी व्यवस्थापक, यशस्वी, स्वतंत्र गुंतवणूकदार ग्रॅहॅमच्या या पद्धतीचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात. शेअर बाजार, गुंतवणूक अशा विषयांवरच्या जवळपास कुठल्याही पुस्तकात ग्रॅहॅमच्या नावाचा उल्लेख झाल्यावाचून राहत नाही. 'व्हिक्टोरियन इंग्लंड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कालखंडात इंग्लंडमध्ये जन्मलेल्या ग्रॅहॅमचं ८२व्या वर्षी फ्रान्समध्ये निधन झालं. जन्मानं तो ज्यूधर्मीय होता. त्याचं मूळ नाव बेंजामिन ग्रॉसबॉम असं होतं. त्याच्या कुटुंबाचा स्वयंपाकघरामधल्या उपकरणांच्या आणि वस्तूंच्या आयातीचा व्यवसाय होता. तो ओळखला मात्र गेला 'बेंजामिन ग्रॅहॅम' या नावानं. अनेक जण त्याचा उल्लेख 'वॉल स्ट्रीटचा डीन' म्हणजे ढोबळमानानं म्हणायचे तर 'शेअरबाजाराचा कुलगुरू' अशा शब्दांमध्ये करतात. शेअरबाजारात अंदाधुंद पद्धतीनं गुंतवणूक न करता ती अत्यंत नियमबद्ध प्रकारे करण्याचं तंत्र त्यानं निर्माण केलं. यासाठी लागणारं धैर्य आणि त्यासाठीची बुद्धिमत्ता हे दोन्ही ग्रॅहॅममध्ये होतं. शिवाय, त्याच्याकडे असलेला आणि इतर अनेक गुंतवणूकदारांकडे नसलेला एक अत्यंत महत्त्वाचा गुण म्हणजे त्याची सहनशीलता. शेअरबाजारामध्ये गुंतवणूक करताना अजिबात उतावीळ होता कामा नये आणि आपल्या भावना पूर्णपणे बाजूला ठेवून फक्त ठळकपणे संधीची चाहूल दिसत असतानाच गुंतवणूक केली पाहिजे, हे तत्त्व त्यानं पाळलं. किंबहुना, ही संकल्पनाच त्यानं जवळपास नव्यानं मांडली. या सगळ्याला आता जवळपास एक शतक उलटून गेलेलं असलं, तरी आजही ग्रॅहॅमच्या संकल्पना जवळपास जशाच्या तशा वापरून कुणालाही आर्थिक यश मिळवणं शक्य आहे, हे खरं म्हणजे विलक्षण आश्चर्यच आहे!


गुंतवणुकीच्या विश्वात ग्रॅहॅमनं अत्यंत मूलभूत कामगिरी बजावलेली असली, तरी त्याला इतर अनेक विषयांमध्येही गती होती. बेंजामिन ग्रॅहॅम आणि वॉरन बफे यांच्यामधल्या काही फरकांमधला हा एक अत्यंत महत्त्वाचा फरक आहे. ग्रॅहॅमनं बऱ्याच विषयांमध्ये बौद्धिक प्रगती तर साधलीच; शिवाय त्याला कलाशाखांमध्येही रस होता. बफे मात्र अक्षरश: अर्जुनासारखा एकलक्ष्यी ठरला. गुंतवणूक सोडून इतर कशामध्येही बफेला अजिबात रस

नव्हता. कदाचित, म्हणूनच ग्रॅहॅमला खूप श्रीमंत होण्यातही रस नव्हता. त्यानं काही काळानंतर गुंतवणुकीच्या विश्वाला सरळ रामराम ठोकला. आपल्या गुंतवणुकीच्या तत्त्वांचा असंख्य लोकांनी फायदा करून घेतल्याचं ग्रॅहॅमला कधीच वाईट वाटलं नाही. बफेनं मात्र आपली गुंतवणुकीच्या संदर्भातली गुपितं इतर कुणालाही समजू नयेत, याची कायम काळजी घेतली. बेंजामिन ग्रॅहॅम उत्तम अर्थतज्ज्ञ होता. त्यानं गणित आणि संदेशवहनामध्ये वापरलं जाणारं 'मॉर्स कोड'चं तंत्र अशांसारख्या विषयांमध्ये पेटंट्स मिळवली! ग्रॅहॅमनं सहलेखन केलेल्या एका नाटकानं 'ब्रॉडवे' या सर्वोच्च मानाच्या समजल्या जाणाऱ्या नाटकाच्या सादरीकरणामध्ये स्थान मिळवलं. याखेरीज एका प्रख्यात स्पॅनिश कादंबरीचा ग्रॅहॅमनं केलेला इंग्रजी भाषेतला अनुवाद अत्यंत उच्च दर्जाचा असल्याचा अभिप्राय तज्ज्ञांनी दिला होता. असल्या कुठल्याही भानगडीत बफे कधीच पडला नाही. कदाचित म्हणूनच बफे गुंतवणुकीच्या विश्वात एवढा यशस्वी ठरला! ग्रॅहॅमच्या बुद्धिमत्तेच्या विविध पैलूंचा सगळ्यात मोठा पुरावा, म्हणजे कोलंबिया विद्यापीठातून त्यानं पदवी घेतल्यावर त्याला त्या विद्यापीठाच्या गणित, इंग्रजी आणि तत्त्वज्ञान अशा तीन विभागांकडून प्राध्यापक म्हणून काम करण्यासाठी बोलावणं आलं होतं! त्याच्या लिखाणातही वैचारिकता, टीका, स्वत:वर टीका, मानसशास्त्र, मैत्रीच्या संकल्पना, प्रेम, लैंगिकता, तत्त्वज्ञान, वादविवाद अशा अनेक मुद्द्यांचा समावेश असल्याचं आढळतं.

आपल्या वाढत्या वयात ग्रॅहॅमनं 'राजाचा रंक' होण्याची परिस्थिती अनुभवली. १९०७ मध्ये अमेरिकी शेअरबाजारात विलक्षण भीती पसरली आणि विक्रीच्या तुफान माऱ्यामुळे असंख्य लोकांचं प्रचंड नुकसान झालं. त्यात ग्रॅहॅमच्या आईचाही समावेश होता. कहर म्हणजे यानंतर स्वत: ग्रॅहॅमनं केलेल्या गुंतवणुकीलाही १९२०च्या दशकाच्या अखेरीला जबरदस्त तडाखा बसला. अमेरिकेतच सुरू झालेल्या जागतिक महामंदीमुळे ग्रॅहॅमचं अफाट नुकसान झालं. तो अक्षरश: कफल्लक व्हायची वेळ आली. असं असूनही ग्रॅहॅमचा शेअरबाजारामधल्या गुंतवणुकीवरचा विश्वास उडाला नाही. उलट आपलं नुकसान नेमकं कशामुळं झालं, याचा अभ्यास करून त्याविषयी भावनिकपणे निर्णय न घेता तटस्थपणे त्यातून बाहेर येण्यासाठीची पावलं टाकण्याचं भान त्याच्यामध्ये होतं.

बेंजामिन ग्रॅहॅमच्या व्यक्तिमत्त्वाला निरनिराळी अंगं होती. काही जण त्याकडे कौतुकानं आणि विस्मयानं बघत; तर काही लोकांना ग्रॅहॅमच्या वागण्यामध्ये अजिबातच नैतिकता नसल्याचं जाणवे. उदाहरणार्थ, ग्रॅहॅम गुंतवणुकीसंबंधीचे वर्ग घेत असे. या वर्गांमध्ये तो तांत्रिक संकल्पना समजावून सांगण्यासाठी खऱ्यासखुऱ्या कंपन्यांची उदाहरणं घेत असे. यातून त्याच्या विद्यार्थ्यांना शेअर्सच्या खरेदी-विक्रीची नामी संधी लाभायची. अर्थातच, यामुळे त्यांचा लखलाभ होत असे. ग्रॅहॅमला त्याचं काही वाटत नसे. तो स्वत: हावरटासारखा या कंपन्यांच्या शेअर्सच्या मागे अजिबात लागायचा नाही. आपल्या ज्ञानाचा आणि परिश्रमांचा फायदा इतक्या सहजपणे आणि जाहीरपणे कुणालाही करून देण्याच्या ग्रॅहॅमच्या या औदार्याचं वॉरन बफेला सतत आश्चर्य वाटत राहिलं. दुसरीकडे ग्रॅहॅमची प्रेमप्रकरणं, त्याची लैंगिकतेविषयीची भूमिका या गोष्टींवर त्याचे काही जवळचे लोकही टीका करत असत. अर्थात, सारासार विचार केला तर बहुतेक सगळे लोक ग्रॅहॅमकडे आदर आणि कौतुक यांच्या संमिश्र नजरांनी बघायचे यात शंका नाही. कदाचित, व्यावसायिकतेच्या बाबतीत ग्रॅहॅम अत्यंत जागरूक असल्यामुळं आणि त्यानं या संदर्भातले सगळे निकष काटेकोरपणे पाळलेले असल्यामुळं असं घडलं असावं. म्हणूनच त्याच्या व्यक्तिमत्त्वामधल्या काही दोषांकडे डोळेझाक करण्याकडे लोकांचा कल असावा.


**नवी संहिता... नवा आशय...**




# कथा या क्षणाची

**कल्पिताहून अद्‍भुत असं सत्य**

**रुथ ओझेकी**

अनुवाद : **वर्षा वेलणकर** आणि **वासंती घोसपूरकर**

डायरीतून उलगडणारी नाओची दाहक जीवनकथा आणि ती वाचणाऱ्या रुथची उत्सुकता.. बुकर पुरस्कार नामांकनप्राप्त एक विलक्षण कादंबरी

**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नवी संहिता... नवा आशय...

# अपूर्व, अलौकिक, एकमेव...




**यशोधरा काटकर**

सालस सुलोचनाबाई,
मनस्वी प्रिया तेंडुलकर,
दिलदार रणजित देसाई...
यशोधरा काटकरांच्या ललितरम्य शैलीतून
उतरलेला व्यक्तिचित्रणात्मक शब्दसाज...

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# कमबख्त निंदर





**नरेन्द्र मोहन**

अनुवाद - **यशोधरा काटकर**

फाळणीचा वेदनादायी इतिहास आणि
१९७५च्या आणीबाणीचा कलह
यांनी अस्वस्थ करणारी
मांडणी असणारं आत्मकथन

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# द कट आउट गर्ल

कहाणी युद्ध अन् कुटुंबाची,
हरवलेले गवसल्याची

**बार्ट व्हॅन एस**

अनुवाद

**दीपक कुळकर्णी**

> *दुसऱ्या महायुद्धातला वेदनादायी विध्वंस आणि त्यात होरपळून निघालेल्या एका चिमुकलीच्या संघर्षाची सत्यकथा...*

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात घडलेली एक विलक्षण सत्यकथा म्हणजे ‘द कटआउट गर्ल’. हॉलंडमधील एक ज्यू मुलगी जिला तिच्याच

पालकांनी नाझींच्या छळापासून वाचवण्यासाठी स्वतःपासून दूर, अनेक वेगवेगळ्या कुटुंबांत सुरक्षित ठेवलं. त्यापैकीच एक असलेल्या तिच्या आश्रित पालकांचा नातू म्हणजेच या पुस्तकाचे लेखक बार्ट व्हॅन एस. हे आहेत. या पुस्तकातून त्यांनी लिंटजे या मुलीची दुर्लक्षित कहाणी मांडून दोन कुटुंबं, तसेच दोन आयुष्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

बार्ट यांना हॉलंड सोडून, इंग्लंडमध्ये स्थायिक होऊन अनेक वर्षं लोटली होती; पण बालपणातील एका गोष्टीने त्यांचा कायम पाठलाग केला. ही रहस्यमय कहाणी होती लिंटजे नावाच्या तरुण ज्यू मुलीची! जिला लेखकाच्या आजी-आजोबांनी युद्धकाळात काही काळ सांभाळलं होतं. पालनपोषण करून मायेने वाढवलं होतं; पण त्यानंतर तिचा त्या कुटुंबाशी संपर्क तुटला. त्या काळात तिला आलेले अनुभव, जन्मदात्यांपासून एकाएकी झालेली ताटातूट आणि या सगळ्या परिस्थितीत तिची असलेली बाजू या सर्व गोष्टी समजून घेण्याचा बार्ट यांनी ध्यासच धरला. बरीच शोधाशोध करून, माहिती मिळवल्यानंतर बार्ट यांना समजले की, लिंटजे सध्या ८० वर्षांची असून, ॲमस्टरडॅम येथे राहत होती. बार्ट यांनी तिचा पत्ता शोधून, तिला भेटण्याची इच्छा बोलून दाखवली. त्यावर ती काहीशा अनिच्छेनेच त्यांना भेटायला तयार झाली आणि या भेटीचे पुढे चांगल्या मैत्रीत आणि मग व्यवसायातील भागीदारीत रूपांतर झाले.


शौर्य आणि औदार्याचे अनेक दाखले देणारं लिंटजेचं आयुष्य प्रचंड विरोधाभासांनी भरलेलं आहे. आधी तिचे पालक तिच्या बचावासाठी तिला एका अनोळखी कुटुंबासोबत राहायला पाठवतात; पण तिथे तिचा शारीरिक आणि मानसिक छळ केला जातो. या दुःखद अनुभवातून स्वतःला सावरणाऱ्या लिंटजेच्या कोवळ्या मनावर झालेला खोल परिणाम पुस्तकात जागोजागी वाचायला मिळतो. कालांतराने तिची कुटुंबे बदलत राहतात. तिच्या आयुष्यात सतत स्थित्यंतरे होत राहतात. मानवी विकृतीच्या अनेक तऱ्हा अनुभवणारी लिंटजे जीवनाला उभारी देणाऱ्या प्रचंड मनःशक्तीचं, सहनशीलतेचं आणि एका असाधारण स्त्रीच्या संस्मरणीय व्यक्तिचित्रणाचं विलोभनीय दर्शन घडवते.

युद्धाच्या काळात टिकून राहण्यासाठी लिंटजेनी केलेली धडपड वाचताना चकित व्हायला होतं. त्या काळातील समाज आणि त्या समाजाची मानसिकता लक्षात घेता, केवळ एक मुलगी म्हणून जगण्यासाठी करावा

लागणारा आटापिटा वेदनादायी आहे, हेही लक्षात येतं. लेखक बार्ट व्हॅन एस. यांनी लिंटजेच्या इतिहासाचा शोध घेत, करुणामय नजरेने मांडलेली ही सत्यकथा मनाचा ठाव घेते. या पुस्तकात केवळ कुटुंब, जीवन, मैत्री या गोष्टींचा मनोवेध न घेता दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील जनजीवन आणि एका विस्थापित स्त्रीचं देदीप्यमान चित्रण वाचायला मिळतं. लिंटजेची शोकात्म कहाणी मांडण्यासाठी लेखकाने तिच्या इतिहासाचा केलेला खोलवर तपास आणि संशोधन कौतुकास्पद आहे. 'द कटआउट गर्ल' या पुस्तकात लिंटजेच्या दुःखदायक आयुष्याबद्दल तर लिहिलेच आहे; पण तिने अनुभवलेल्या माणसांच्या विविध तऱ्हा आणि दुसऱ्या महायुद्धात घडलेल्या वेदनादायी विध्वंसावरदेखील प्रकाश टाकला आहे. एक मन हेलावून टाकणारी कादंबरी, तितक्याच सुंदर शैलीत वाचताना मनावर गारूड करत जाते.

◆


नवी संहिता... नवा आशय...




**अमेरिकेचा न सांगितला गेलेला संक्षिप्त इतिहास**

**ऑलिव्हर स्टोन । पीटर कुझनिक**

अनुवाद - **प्रशांत तळणीकर**

जागतिक महासत्ता म्हणून मिरवणाऱ्या
अमेरिकेच्या इतिहासाची काळी बाजू मांडणारं,
अज्ञात इतिहासाची पोलखोल करणारं पुस्तक

**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


**नवी संहिता... नवा आशय...**

# वेगळ्या वाटेवरचा डॉक्टर

## डॅमियन ब्राऊन

अनुवाद - **मंजूषा मुळे**

मूलभूत गरजांपासून वंचित राहिलेल्या आफ्रिकन नागरिकांचं करुणादायी वास्तव आशादायी करण्यासाठी झटणाऱ्या विलक्षण डॉक्टरची सत्यकथा...





**किंमत : ५९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# दूर घर माझे...

## लेइला अबोउलेला

अनुवाद - **सुनंदा अमरापूरकर**

वेगानं बदलणाऱ्या जगात
दूरदेशीच्या घरांचा
शोध घेणाऱ्या जीवांच्या कथा




**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय







**चार्ल्स ग्लास**

अनुवाद

**वृन्दा उन्हाळे**

*नाझीव्याप्त फ्रान्समधील ब्रिटिश सिक्रेट एजंट्स स्टार बंधूंची खरी कहाणी*

*धैर्य हाच त्यांचा समान बॅज होता*

मॉरिस बकमास्टर

डि कन्सने म्हटल्याप्रमाणे जर्मन आक्रमणानंतरचा

फ्रेंच क्रांतीचा काळ अभूतपूर्व असाच होता. फ्रेंच सैन्याच्या जून १९४० मधल्या दारुण पराभवानंतर फ्रेंच महिला आणि पुरुष यांच्यासमोर दोनच प्रकारचे पर्याय उरले होते, धैर्य किंवा भ्याडपणा, बंड किंवा आज्ञापालन, स्वातंत्र्य किंवा गुलामगिरी. दुसऱ्या पर्यायामुळे शत्रूला आणखीच बळ मिळाले असते. जे ठाम आणि शूर होते त्यांना आधारासाठी म्हणा किंवा मदतीसाठी म्हणा आपल्या पुरातन शत्रूकडे म्हणजेच इंग्लंडकडे जाण्याची इच्छा नव्हती. तरीही ब्रिटिशांनी त्यांच्या मदतीला सैन्य तर पाठवलेच; पण मुख्य म्हणजे जबाबदार महिला आणि पुरुष पाठवले. त्यांचे काम होते फ्रेंचांच्या वेगवेगळ्या गटांना नीट संघटित करून त्यांना अधिक प्रभावी बनवणे.

सर्वसाधारण जनतेच्या माहितीनुसार, प्रतिकाराला रसद पुरवणारी स्पेशल ऑपरेशन्स एक्झिक्युटिव्ह अर्थात एसओई अशी कोणतीही संघटना मुळात अस्तित्वातच नव्हती आणि तसेही १६ जुलै,१९४० पर्यंत ती नव्हतीही. इंग्लंडचे नवे पंतप्रधान, विन्स्टन चर्चिल यांनी ती निर्माण केली. त्या वेळी चर्चिल यांनी एसओई प्रमुखांना सूचना केली, 'युरोपला पेटवा...' हे त्यांचे वाक्य खूप गाजले.

आपल्या सम्राज्यामध्ये बंडखोरांना निपटून काढण्यासाठी करण्याच्या कारवायांचा अफाट अनुभव असलेल्या ब्रिटनसाठी एसओई हे काहीतरी नवीन होते. जेव्हा जर्मनीने बहुतेक युरोपियन खंड ताब्यात घेतला तेव्हा ब्रिटिशांनी त्यांच्या वसाहतीत त्यांनी ज्या बंडखोरांना दडपले, त्यांनाच आपला पाठिंबा दर्शवला. एसओईचे आदर्श म्हणजे लॉरेन्स ऑफ अरेबिया, सीरियामधील तुर्कांविरुद्ध अरबांच्या बंडाचे सूत्रधार आणि वीस वर्षांपूर्वी दक्षिण आयर्लंडमधून ब्रिटिशांना हद्दपार करणारे आयरिश रिपब्लिकन सैन्य होते. लंडनच्या ६४, बेकर स्ट्रीटवरील एसओईच्या हेडक्वार्टरला आंतर-सेवा संशोधन कार्यालय असे निरुपद्रवी नाव देण्यात आले होते. कर्मचाऱ्यांकडून कार्यालयीन गुपिते राखण्याबाबतच्या करारावर सह्या घेण्यात आल्या होत्या. अगदी त्यांच्या कुटुंबाशीही कामाबाबत बोलण्यास त्यांना मज्जाव करण्यात आला होता. आर्थिक युद्ध मंत्री ह्यू डाल्टन यांना अहवाल देणारी ही संघटना जुन्या गुप्तहेर संस्था, एसआयएस किंवा एम१६ यांची प्रतिस्पर्धी झाली. उद्दिष्टांच्या सीमारेषा स्पष्ट असूनही एम१६ला नवख्या आणि त्यांच्या मते अपरिपक्व लोकांच्या घुसखोरीबद्दल चीड होती. एम१६

गुप्तपणे माहिती गोळा करत असे, तर एसओई पडद्यामागे हिंसक कारवाया करत असे. एम १६ची पद्धत गुप्त तर एसओईची धाडसी होती.

ॲक्सिस रुलअंतर्गत येणारा प्रत्येक देश, अगदी सुदूर पूर्वेपासून ते फ्रान्सपर्यंत, एसओईच्या एका विभागाकडे असे ज्यात स्थानिक लोकांची भरती करून, त्यांना प्रशिक्षित करून, त्यांना शस्त्रसज्ज करून आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी सज्ज केले जाई. एसओईच्या फ्रेंच विभागाचा प्रमुख (एफ विभाग) कर्नल मॉरिस बकमास्टर, एक चाणाक्ष कमांडर आणि कर्मचाऱ्यांचा चांगला नेता होता. तो माणसांना अचूक पारखत असे. त्याने ब्रिटनच्या उच्चभ्रू इटन महाविद्यालयात शिक्षण घेतले होते आणि ऑक्सफर्ड विद्यापीठात तो प्रवेश घेणार होता, तेवढ्यात वडिलांवर अचानक आलेल्या दिवाळखोरीमुळे त्याच्या शिक्षणात खंड पडला. मॉरिस बकमास्टर त्यानंतर फ्रान्सला गेला आणि त्याने फ्रेंच भाषेवर इतके प्रभुत्व मिळवले की तो एक पत्रकार म्हणून 'ले मेताँ' या फ्रेंच वृत्तपत्रात लेखन करू लागला. नंतर, पॅरिसमध्ये फोर्ड मोटर कंपनीचा असिस्टंट मॅनेजर म्हणून त्याने तिथल्या रस्त्यांचा आणि रेल्वे मार्गांचा अभ्यास केला, ही माहिती पुढे त्याला अतिशय उपयोगी पडली. त्याचे मित्र आणि सहकारी त्याला 'बक' असे संबोधत असत. युद्धाच्या ऐन उद्रेकाच्या वेळी तो सैन्यात भरती झाला. इंग्लंडमध्ये त्याने मूलभूत प्रशिक्षण घेतले आणि जर्मन आक्रमण रोखण्यासाठी ब्रिटिश मोहिमेतला एक घटक म्हणून तो फ्रान्सला परतला. जेव्हा ब्लिट्झक्रीगचे झंझावती आक्रमण झाले तेव्हा आपल्या साथीदारांसोबत मागे हटत जून १९४०मध्ये तो डनकर्कहून इंग्लंडला पोचला आणि मार्च १९४१मध्ये त्याने एफ सेक्शनच्या कारभाराचा ताबा घेतला. त्या वेळी तो एकतीस वर्षांचा होता. मॉरिस बकमास्टरच्या एका सहकाऱ्याने लिहिले आहे की तो एक उंच, सौम्य माणूस होता. त्याचे डोळे नंतरच्या आयुष्यात असे दिसत की त्यांनी जवळपास सगळेच पाहिले आहे. तो रोज सरासरी अठरा तास काम करत असे. एसओईच्या सिग्नलचे मुख्य लिओ मार्क्स यांनी म्हटले आहे की एजन्टांची सुरक्षा ही त्याची प्रमुख प्राथमिकता असे.

एसओईने मे १९४१ला फ्रान्समध्ये चोरून पाठवलेला पहिला एजन्ट रेडिओ ऑपरेटर जॉर्ज बेग हा होता. ब्रिटनने खंडातून सशस्त्र सेना आणि गुप्तचर खात्यातले मनुष्यबळ आणि इतर सामग्री हलवल्यानंतर एका

वर्षापेक्षा कमी कालावधीत हा एसओई एजन्ट फ्रान्समध्ये दाखल झाला. त्यानंतर पुरुष आणि महिलांनी भयंकर धोके पत्करून पॅराशूट, पाणबुडी, सेलबोट आणि वेस्टलॅन्ड लायसॅन्डर लाइट एअरक्राफ्टने शत्रूने व्यापलेल्या परिसरात घुसखोरी केली. एसओईच्या टीममध्ये एक संघटक, रेडिओ ऑपरेटर, वायरलेस टेलिग्राफर आणि कुरिअरचा समावेश होता. लंडनशी दुवा साधण्यासाठी वायरलेस टेलिग्राफर्सनी मॉर्स कोडमध्ये पत्रे टॅप केली, तर कुरिअर्सनी सायकली, बसेस, कार्स, रेल्वे आदींचा वापर करून संघटकांकडचे निरोप फील्ड एजन्ट्सपर्यंत पोचवले. हे कुरिअर्स जास्त करून महिला असत; कारण जर्मन्स त्यांची झडती, सैनिकी वयोगटातील पुरुषांपेक्षा, कमी काटेकोरपणे घेत.

एका फ्रेंच गुप्तचर इन्स्पेक्टरला या व्यवस्थेबद्दल शंका होती. त्याचे म्हणणे होते की इंग्रजांनी जर तिघांच्या गटात त्यांचे एजन्ट्स पाठवले, ज्यात दोन पुरुष आणि एक मुलगी असेल; पण महत्त्वाच्या बाबीकडे त्यांचे लक्ष गेले नाही की मुलीचा मित्र कोण असावा असा प्रश्न साहजिकच उपस्थित होईल आणि गुंतागुंत वाढेल. या त्रिसदस्यीय टीम्सनी प्रादेशिक रेझिस्टन्स सर्किट्स चालवले आणि बटलर, फायरमन, लेखक अशा अनेक प्रकारच्या लोकांची भरती केली जे आंतरसंदेशवहन करण्यासाठी उपयुक्त ठरले असते.

या एकमेकांशी जोडलेल्या जाळ्यांमध्ये फ्रेंच पुरुष आणि महिलांना नाझींविरुद्ध घातपाती कृत्ये करण्यासाठी भरती करण्यात आले आणि महत्त्वाचे म्हणजे मित्रराष्ट्रांनी जेव्हा फ्रान्सवर आक्रमण केले तेव्हा मागच्या बाजूने जर्मनांवर हल्ला करण्यासाठी या तयारीचा उपयोग झाला.

फ्रान्समध्ये गुप्तपणे पाठविलेल्या लोकांमध्ये जॉर्ज आणि जॉन स्टार हे भाऊ होते, ज्यांचे वडील आणि आजोबा यांनी पहिल्या महायुद्धापूर्वी मातृदेशात कुटुंबाचे पुनर्वसन केले होते.

तो त्यांचा एकाकी संघर्ष होता. बायकामुलांपासून दूर राहून, नियमित लष्करी युनिटच्या सहकाऱ्यांपासून वंचित राहून, पुरवठ्याच्या सर्व स्रोतांपासून लांब राहून शत्रूच्या अगदी जवळपास फक्त स्वतःच्या जबाबदारीवर राहणे अवघड तर होतेच; पण पकडले गेल्यास एफ-सेक्शन त्यांचा बचाव करू शकले नसते आणि त्यांना अतोनात छळ आणि हत्येला अपरिहार्यपणे सामोरे जावे लागले असते. बकमास्टरच्या संस्मरणाचे शीर्षक

होते, 'ते एकाकी लढले' ज्यामध्ये जॉर्ज आणि जॉन स्टार बंधूंचे शत्रूव्याप्त फ्रान्समधले अनुभव रेखाटले आहेत. हेच शीर्षक घेणे म्हणजे बकमास्टर यांना वंदन करणे आणि जॉर्ज आणि जॉन स्टार बंधूंचे त्यांच्या असीम शौर्याबद्दल आभार मानणे आहे. युद्धकाळातील यशाच्या वर्णनांमुळे बकमास्टरच्या चमकदार चित्रणाला मार्मिकता लाभली आहे.

फ्रान्स त्या वेळी देशद्रोही, खबरे आणि संधिसाधू यांनी गजबजला होता. १९४०च्या पराभवास कारणीभूत भ्रष्टाचारामुळे, भ्रष्टाचारमुक्त फ्रान्सच्या कल्पनेवर निष्ठा असल्याने काही फ्रेंच लोकांनी जर्मनांना सहकार्य केले. काहींनी प्रगतीच्या आशेने कबजा करणाऱ्या जर्मनांना अनुकूलता दर्शवली. अनेकांनी जुने हिशेब चुकते करण्यासाठी या संधीचा उपयोग केला. स्टार बंधू केवळ अशा काही मोजक्या पुरुष आणि स्त्रियांवर विसंबून राहू शकले, ज्यांच्या देशभक्तीमुळे आणि जिद्दीमुळे त्यांनी असह्य यातना, निर्घृण हत्या किंवा छळछावण्यांमध्ये अपमानास्पद आणि निनावी मृत्यूचा धोका पत्करला.

फ्रान्सवर कबजा करणाऱ्या जर्मनांनी फ्रेंचांविरुद्ध फ्रेंचांना अत्यंत क्रूरपणे उभे केले. डिकन्सच्या भाषेत तो अतिशय शहाणपण आणि अतिशय मूर्खपणाचा काळ होता. २२ जून, १९४० रोजी फ्रान्सने जर्मनीशी केलेल्या शस्त्रसंधी करारामुळे उत्तरेकडील जर्मनव्याप्त प्रदेशात आणि दक्षिणेकडील स्वायत्त फ्रेंच राजवटीत, तथाकथित झोन लिब्रे किंवा फ्री झोन या प्रदेशात देशाचे विभाजन झाले. व्हिशी येथे या फ्री झोनची राजधानी निर्माण झाली. पराभवानंतर फ्रेंचांना विभाजित करणाऱ्या अनेक घटकांपैकी भौगोलिक पृथक्करण हा केवळ एक घटक होता. इतर घटक राजकीय, वैचारिक आणि वैयक्तिक होते. अशा संदिग्ध राजकीय वातावरणात वावरणे आणि फिरणे स्टार बंधूंच्या जगण्यासाठी आणि यशस्वी होण्यासाठी तितकेच महत्त्वाचे होते, जितके लपण्यासाठी सुरक्षित घरे शोधणे, शस्त्रास्त्रांचे साठे आणि शॉर्टवेव्ह रेडिओ ट्रान्समिशनसाठीची ठिकाणे शोधणे होते.

एक सर्वोत्कृष्ट फ्रेंच इतिहासकार असलेल्या ऑलिव्हियर वायव्हिएरका यांनी लिहिले, 'फ्रेंच लोकांच्या नजरेतून या राजवटीला नक्कीच एक कायदेशीरपणा मिळाला.' फ्रान्सच्या तिसऱ्या प्रजासत्ताकाने १० जुलै, १९४० रोजी स्वतःच्या अस्तित्वाचा फारसा विचार न करता आपले मत दिले आणि वर्ल्डनचा हिरो म्हणून प्रसिद्ध असलेल्या पहिल्या महायुद्धाचे नायक

वयोवृद्ध मार्शल फिलिप पेताँ यांच्याकडे सत्ता दिली. वायव्हिएरका यांनी लिहिले, की प्रतिकारात सामील होणे म्हणजे कायद्याबाहेर पाऊल टाकण्यासारखेच होते; पण डच, बेल्जिअन आणि नॉर्वेजियन नागरिकांना त्यांची सरकारे लंडनमध्ये हद्दपार झाल्यामुळे हा धोका पत्करावा लागला नाही.

अमेरिकेने पेताँ राजवटीचे महत्त्व ओळखले आणि वरिष्ठ नौदल अधिकारी, ॲडमिरल विल्यम डी. लेही यांना व्हिशी येथील राजदूत म्हणून नेमले. अनेक फ्रेंच लोकांचा असा विश्वास होता की फ्रान्सची निष्ठा ही कायदेशीर सरकारशी एकनिष्ठतेची मागणी करते. लंडनमधील फ्रेंच जेनेराल शार्ल द गॉल यांच्या, 'माझा आवाज ऐका आणि माझ्या मागे या,' या जुलै १८,१९४० ला केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देणारे देशप्रेमी फारच थोडे होते. खरेतर बहुतेक फ्रान्स जनरलचे प्रसारण ऐकण्यात अक्षम होता. फ्रेंच सैन्याने डी गॉले यांना दोषी ठरवत त्यांना फाशीची शिक्षा जाहीर केली होती. व्हिशीने भूमिगत विरोधकांना 'दहशतवादी' म्हणून फाशीची शिक्षा जाहीर केली.

फ्रेंच लोकांचे नंतर तीन प्रकारांत विभाजन झाले. रेझिस्टंट्स, ज्यांनी नाझींशी आणि व्हिशी शासनाशी संघर्ष केला, कोलाबोस ज्यांनी जर्मनांसोबत काम केले आणि अटेन्टिस्ट्स, जे बहुसंख्येने होते आणि जे कोण जिंकत आहे त्याची वाट पाहत राहिले. संभाव्य प्रतिकाराचा उघड स्रोत असलेले सैन्याचा अनुभव असलेले देशातील जवळपास दीड दशलक्षाहूनही अधिक तरुण जर्मनीच्या युद्धतळांवर कैदी म्हणून अडकले होते. एसओई मदतीसाठी असे लोक शोधत होती, ज्यांनी पकडले जाणे टाळले होते आणि ज्यांनी सैन्यात काम केले नव्हते. त्यात प्रतिकार करणाऱ्या चळवळींच्या एकमेकांतील तीव्र स्पर्धा ही वेगळीच गुंतागुंतीची गोष्ट होती. काही जण डे गॉलेशी निष्ठावान होते, तर काहींनी हेन्री गिरौद नावाच्या फ्रेंच जनरलला अनुकूलता दर्शविली होती, जो जर्मन युद्धछावणीतून निसटला होता आणि त्याला डे गॉलेनंतर अमेरिकेचा आवडता नेता व्हायचे होते आणि ज्याचा अध्यक्ष फ्रँकलिन डी. रुझवेल्ट द्वेष करीत. बरेच लोक कम्युनिस्ट पक्षाशी संबंधित असलेल्या संघटनांचे होते, ज्यांनी १९४१च्या जूनमध्ये हिटलरने रशियावर चढाई करेपर्यंत प्रतिकारास पाठिंबा दर्शविला नव्हता.

याशिवाय तिथे समाजवादी, राजेशाहीच्या बाजूने असलेले रॉयलिस्ट्स आणि विश्वबंधुत्व, सहकार्य अशी ध्येये असलेल्या संस्थेचे सदस्य, ज्यांना फ्रीमॅसन म्हटले जाई असे अनेक प्रकारचे लोक होते. बऱ्याच गटांनी एकमेकांकडून शस्त्रे चोरली आणि त्यांची विचारधारा, रणनीती आणि प्रदेश यांवर त्यांच्यात जोरदार संघर्ष झाला.

ब्रिटिश एजन्ट्स म्हणून काम करताना जॉर्ज आणि जॉन स्टार एखाद्याला ठार कसे करायचे ते शिकले; पण अर्थातच प्रशिक्षण देणाऱ्या संस्था त्यांना कोणावर विश्वास ठेवावा हे शिकवू शकल्या नाहीत. त्यांना फ्रेंच लोकांच्या भावना समजून घ्याव्या लागल्या आणि एक माणूस म्हणून आपल्या भावनांवर आणि आतल्या आवाजावर अवलंबून राहावे लागले. त्यांचे जगणे आणि लढ्याचे भविष्य याच गोष्टींवर अवलंबून होते.


**नवी संहिता... नवा आशय...**



सांगाती ...स्मरणझुला एका जिप्सीचा

**सदानंद कदम**

साहित्यापासून संगीत-नाट्य-कलांपर्यंत, इतिहासापासून गडकोटांपर्यंत अनेक क्षेत्रातील दिग्गज प्रतिभावंतांचं जिव्हाळपण अनुभवलेल्या आणि ते शब्दबद्ध केलेल्या हरफनमौला सदानंद कदम यांची विलक्षण स्मरणयात्रा...


**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नवी संहिता... नवा आशय...

# गुंतवणूकभान

## अतुल कहाते

पैशाला द्या पैशाचं मोल,
निगुतीने सोडवा
गुंतवणुकीचा झोल...
**गुंतवणुकीचा मार्गदर्शक!**





**किंमत : १८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

नवीन सुधारित आवृत्ती...

# जाईची सुगंधी फुले

## किसन दगडू शिंदे

एका अनाथ, गरीब,
मागासवर्गीय मुलाने स्वकर्तृत्वाने
कनिष्ठ अभियंता ते कार्यकारी
संचालक पदापर्यंत केलेल्या
प्रवासाची यशोगाथा




**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

अभिप्राय

## रिवणावायली मुंगी / आपण माणसात जमा नाही





कधी कधी काही पुस्तकं फार उशिरा हातात पडली असं वाटतं, त्यातलीच ही दोन. आजवर जरी पुस्तकं वाचली तरी पुस्तक वाचताना आपण पुस्तक वाचत आहोत, ही जाणीव मनाच्या तळाशी जिवंत असायची; पण राजन गवस यांचे कथासंग्रह त्या अर्थाने मला वेगळेच भासले. त्यांच्या कथा एखाद्या चित्रपटाप्रमाणे मनःपटलावर जिवंत होतात. स्मृतीत रेंगाळत राहतात. हे कथासंग्रह प्रत्येक मनाचे आहेत. स्त्री आत्ताची असो वा ऐंशी-नव्वदीच्या काळातली असो, तिची जीवनमूल्ये, तिची घुसमट, तिची बदलत जाणारी दृष्टी हे जितकं राजन गवस यांनी अस्सलपणे मांडलं आहे, तितकंच प्रभावीपणे बदलत्या गावगाड्यातल्या माणसांचे औद्योगीकरण, बदलत जाणारे राहणीमान, पालटत जाणारे दोन पिढ्यांतील अंतर, त्यातून होणारी मानवी मनाची उलाघाल याचे अतिशय प्रभावी चित्रण या कथासंग्रहातून केले आहे. एकसंधतेतून विस्कळीत होत व्यवहारी आणि भोगवादी बनत



गेलेली पिढी आणि त्यातून जुन्या संस्कारातील मानवी मनावर येणारा ताण अशा मानवी मनाच्या वेगवेगळ्या पैलूंवर या कथा प्रकाश टाकतात. राजन गवस यांच्या कथा जितक्या श्रेष्ठ आहेत तितक्याच विविधांगी आहेत. वाचकाला चौकटीबाहेर विचार करायला लावून जीवनार्थाने समृद्ध करतात.

**- बी. पूर्वा**

## प्रतीक्षा



रणजित देसाईंच्या अनेक पुस्तकांपैकी हे पुस्तक मला खूप जवळचे आहे. त्यांची जी ठरावीक लेखनशैली आहे, त्याहून ही मला थोडी वेगळी वाटली. थोडी अनपेक्षित अशी ही कथा आहे; परंतु बाज तोच.. व्यक्त न झालेल्या भावना, पात्रांची दुःखे, त्यांचा भूतकाळ याबद्दल ते असे लिहितात की, डोळ्यांत सहज पाणी उभे राहते, त्यांच्या कथा हृदयाचा ठाव घेतात. ही एक प्रेमकथा म्हणण्यापेक्षा भावकथा म्हणू शकता. कमी शब्दांत ही कादंबरी त्यांनी मांडली आहे. कथेतील मिलिंद दुःखी आहे, प्रवासी आहे. कशाच्या तरी शोधात तो एक हिमालयातील आश्रमात येतो. तिथे त्याची भेट बाबा, नंदिनी, लहान राहुल यांच्याशी होते. त्यांच्या प्रेमळ वागण्याने तो सुखावून जातो आणि काही दिवस तिथे राहतो. नंदिनीला पाहताक्षणी दोघांनाही एकमेकांबदल ओढ जाणवते. बाबांना या सर्व गोष्टी जाणवतात. पुढे काय होतं ते तुम्हाला कादंबरी वाचूनच कळेल.. मला असं वाटतं या कथेचा शेवट काय आहे, यापेक्षा त्यांनी पुस्तकातून जीवनाबद्दल, प्रेमाबद्दल जे काही विचार मांडले आहेत ते खूप काही देऊन जातात. मला या कथेत जर कोणतं पात्र आवडलं असेल तर ते आहेत बाबा..! बाबा संन्यासी आहेत; परंतु त्यांच्या गतआयुष्यात ते देखील प्रेम, वैवाहिक जीवन यातून गेले आहेत. ते नंदिनीवर मुलीसारखं प्रेम करतात. स्वतःच्या वयाचा विचार न करता रुग्णसेवा करतात. ते खूप प्रेमळ आहेत. भटकलेल्या मिलिंदला समजून घेतात. बाबा आणि मिलिंद यांच्यातील संवाद म्हणजे कथेचा खरा आत्मा आहे. नि:स्वार्थी प्रेम,


वैवाहिक सुख, ईश्वरभक्ती, श्रद्धा, मृत्यू याबद्दल बाबा भरभरून बोलतात. प्रेमाचा विशुद्ध, सात्त्विक, तरल भाव या कथेत आहे. असाच 'अभोगी'मध्ये जाणवतो आणि खांडेकरांच्या 'अमृतवेल'मध्ये पण... For me it's a philosophical feast, we are looking for something and I hope we will find that some day.. मला आवडलेला एक परिच्छेद खाली देत आहे,

''ही बघ ना गौरांगी! कसल्या ओढीनं ती या पर्वतकड्यावरून झेप घेते आहे? ज्या ओढीनं ती या प्रचंड नगाधिराजाच्या मस्तकावरून झेपावत आहे, ती सागरतृष्णा खरोखरच एवढी श्रेष्ठ आहे का? जेव्हा ती सागराला मिळेल, तेव्हा या तपश्चर्येचं सार्थक होईल का? ह्यालाच का आपण प्रेम म्हणतो? हे प्रेम नव्हे. हे वासनेचं प्रतीक आहे. वासना प्रबळ आहे; पण त्याहीपेक्षा प्रेमाचा ओघ शतपटीनं प्रबळ असूनही त्यात रौद्रता नाही. त्यात समाधान आहे, सुख आहे आणि म्हणूनच आज प्रमत्त होऊन पर्वतशिखरावरून झेपावणारी कर्पूरगंगा तन्वंगी प्रेमाचा अर्थ कळू लागल्यावर पुढं अधिक शांत, गंभीर होत असावी...''

**- स्मिता नारायण**

ǪՁ

## कर हर मैदान फ़तेह




विश्वास नांगरे पाटील सरांचे पुस्तक 'कर हर मैदान फ़तेह'. यात शब्दबद्ध केलेला यूपीएससी झाल्यानंतरचा विश्वास सरांचा पुढील प्रवास हा तितकाच प्रेरक आणि मार्गदर्शनपर आहे. अनेक उदाहरणे, अनेक थोर व्यक्तींची सुभाषिते आणि विचारांतून त्यांनी मार्गदर्शन केले आहे. शरीर व मन निरोगी आणि तंदुरुस्त राहण्यासाठी कोणते व्यायाम करावे, महिलांनी स्वतःच्या सुरक्षेसाठी काय करावे किंवा काय करू नये, लहान मुलांच्या हाती मोबाइल देताना पालकांची कोणती कर्तव्ये आहेत किंवा डिजिटल बँकिंग वापरताना कोणती खबरदारी घ्यावी. अगदी आपले डिजिटल पासवर्ड कसे असावे

आणि कधी बदलावे याविषयी अगदी कळकळीने विश्वास सर सांगतात. विपरीत परिस्थिती कशी हाताळावी, आलेल्या संकटसमयी त्याला धैर्याने कसे सामोरे जायला हवे, सर्वकाही असताना डिप्रेशन का येते आणि त्यातून स्वतःला कसे सावरावे हे सर सांगतात. 'वर्दीच्या आतला प्रत्येक पोलीस हा एक नागरिक असतो आणि प्रत्येक नागरिक हा विनावर्दीचा पोलीस असतो.' किती अर्थपूर्ण आहे हे विधान. अशा अनेक गोष्टी आणि प्रसंग वाचताना खूप आत्मविश्वास निर्माण होतो. म्हणून विद्यार्थ्यांनी तर हे पुस्तक नक्की वाचावेच; पण पालकांनीही ते जरूर वाचायला हवे. किंबहुना, प्रत्येकाने हे पुस्तक जरूर वाचायला हवे असे मला वाटते.

**- पंकज खराडे**

## आवरण





आत्ताच 'आवरण' ही डॉ. एस. एल. भैरप्पा लिखित आणि उमा कुलकर्णी यांनी अनुवादित केलेली कादंबरी संपवली. वाचून सुन्न होणे म्हणजे काय याचा प्रत्यय आला. कादंबरीची नायिका लक्ष्मी ऊर्फ रझिया, तिचा नवरा आमिर, लक्ष्मीचे वडील अप्पाजी, त्यांचे मित्र शेषराय शास्त्री आणि त्यांचा मुलगा प्रोफेसर शास्त्री ही कादंबरीतील प्रमुख पात्रे. कादंबरीचा काळ १९९० नंतरचा आणि त्यासाठी अभ्यासलेल्या ग्रंथांचा काळ साधारण सोळाव्या शतकापासूनचा. लक्ष्मीचे धर्म बदलून रझिया होणे आणि आंतरधर्मीय विवाह करणे या संदर्भातून कादंबरीची सुरुवात होते. सत्य इतिहासाचा अभ्यास करत जातानाच राजकारणासाठी तो लपवून खोटा इतिहास लादला जातोय हे सत्य तिच्या तकलादू सुधारणावादी विचारांना हलवून सोडते. जसजशी अभ्यासात खोल बुडत जाते, तसतसे तिला आणखीन जोराचे धक्के बसत जातात. बाबरी मशीद पाडली त्याच्या भोवतालचा काळ आणि मुघलसम्राट औरंगजेब याचा काळ यांची संदर्भासाठी केलेली एकत्र गुंफण कादंबरीची परिणामकारकता वाढवते. संपूर्ण हिंदुस्थानाचा समृद्ध, धार्मिक, सांस्कृतिक वारसा, ज्ञानकेंद्रे आणि त्याचा सोळाव्या शतकापासून बाहेरील आक्रमकांकडून झालेला विध्वंस हा

कादंबरीचा मुख्य गाभा आहे. अल्पसंख्याक असलेल्या धर्माच्या मागासलेल्या रूढी, परंपरा, दुरभिमान, अशिक्षित मनोवृत्ती आणि जीवनपद्धती, असहिष्णुता यावर नायिकेच्या माध्यमातून लेखक प्रहार करतात. तत्कालीन राजकारण, समृद्ध आणि सहिष्णु परंपरेचा, स्वार्थासाठी इतिहास बदलण्याचा समकालीन पुरोगामी आणि बुद्धिवादी लोकांचा अट्टहास, त्यासाठी झालेली एकजूट, वाचकांना चीड आणल्याशिवाय राहत नाही. वर्षानुवर्षे चांगले दडपण्यासाठी चाललेले, जनकल्याणाचे सोनेरी आवरण घातलेले कपटी कारस्थान वाचकांसमोर उघड होते. बुद्धिवादी, सेक्युलर म्हणवणाऱ्या लोकांचा मुखवटा टराटरा फाडते. कादंबरी पूर्णतः सत्य संदर्भावर आधारलेली आहे. संदर्भ ग्रंथांची यादी कादंबरीत लेखकाने समाविष्ट केली आहे, त्यामुळे कादंबरीला वास्तवाचा भक्कम आधार आहे. लेखकाचा थक्क करणारा अभ्यास आणि त्याचबरोबर अपरिमित सांस्कृतिक हानी करण्याचे, खरा इतिहास जाणीवपूर्वक दडपण्याचे हे कारस्थान सुज्ञ वाचकाला सुन्न करून टाकते. लेखकाने खरा सर्वधर्म विचार नायिकेमार्फत मांडला आहे, जो सशक्त राष्ट्र उभे करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरू शकतो. कादंबरीचा खरा उद्देश हाच आहे, असे मला वाटते. प्रत्येकाने वाचावी अशी अभ्यासपूर्ण कादंबरी.

**- निशिगंधा जोशी**

## पाचूचे बेट




कालखंड कोणताही असो, एखाद्या दर्यावर्दी खलाश्याचं जीवन हे नेहमीच रोमांचकारी घटनांनी भरलेले असतं. दर्यावरच्या मोहिमेत प्रत्येक दिवस हा त्याच्यासाठीचा एक नवीनच अनुभव असतो. आजच्या विज्ञानयुगात माहिती मिळवण्याची अनेक साधने हाताशी आहेत. अनेकानेक गोष्टींविषयीचं ज्ञान सहजपणे मिळू शकतं. त्यामुळे कदाचित या सागरी मोहिमा थोड्याफार सुकर झाल्या आहेत, असं आपण नक्कीच म्हणू शकतो; पण जर समजा, हा कालखंड अठराव्या शतकातील असेल तर? ज्या वेळेस माहिती

मिळवण्याची साधनं अगदीच तुटपुंजी होती. अगदी समुद्राच्या एखाद्या भागाची, एखाद्या बेटाची माहिती मिळवायची असेल तर त्या भागात भेट देऊन आलेल्या व्यक्तीच्या अनुभवावर अवलंबून राहावं लागायचं. त्या व्यक्तीने दिलेली माहिती ही परिपूर्ण असेलच असंही नव्हतं. पुढे ती माहिती एकमेकांना सांगताना तिखट-मीठ लावून सांगितली जायची. आणि मग त्या माहितीच्या गूढरम्य कहाण्याच बनून जायच्या. 'Typee' ही पण एक गूढरम्य कहाणीच आहे. १८४२ मध्ये हर्मन मेलव्हिल हा खलाशी एका सागरी मोहिमेत सहभागी झाला. या प्रवासातील घटनांचे शब्दचित्र म्हणजे हे पुस्तक, 'Typee' या इंग्रजी पुस्तकाचा मराठी भाषेत अनुवाद केलाय भानू शिरधनकर यांनी, 'पाचूचे बेट' या नावाने. पॅसिफिक महासागरात मासेमारीच्या मोहिमेसाठी जहाजे उतरत. या मोहिमा अगदी चार-पाच वर्षं सतत चालत. या मुदतीचं वर्णन करताना लेखक म्हणतो, 'या मोहिमेत सहभागी झालेले कोवळे तरुण आपल्या आईचा निरोप घेऊन रवाना झाले ते परत आपल्या बंदरात आले त्या वेळी अर्धम्हातारे झाले होते. जहाजावरील सोयी-सुविधांच्या अभावी निर्माण झालेली गचाळ परिस्थिती, कधी कधी जहाजाला मिळालेला विक्षिप्त, हट्टी कप्तान आणि महिनोन्महिने दुर्लभ झालेलं जमिनीचं दर्शन यामुळे या सागरी मोहिमा म्हणजे एक नाइटमेअर असत.' लेखक हर्मन मेलव्हिल 'डॉली' नावाच्या जहाजावर खलाशी म्हणून सहभागी होतो. ही मोहीम एवढी लांबते की, जहाजावरील अन्नधान्य संपत येऊ लागतं, जहाजावरील खलाश्यांचं मनोधैर्य डळमळू लागतं. आणि अशा परिस्थितीत लेखक जहाजावरून फरार होण्याचा निर्णय घेतो, जो फार धोकादायक निर्णय असतो. नुकूहेवा नावाच्या बेटावर त्यांचे जहाज थोड्या काळासाठी थांबले असताना लेखक त्या जहाजावरून फरार होण्यात यशस्वी होतो. यात त्याला जहाजावरचा आणखी एक खलाशीही सामील होतो, ज्याचं नाव असतं टॉबी. आणि इथून सुरू होते, त्यांची थरारक, 'फरार - सफर.' या प्रवासाचं वर्णन लेखकाने बहारदार केलयं. समुद्राच्या लगत असणाऱ्या बेटावरचं हवामान, वातावरण, उंचच उंच टोकदार डोंगर, खोल दऱ्या, घनदाट जंगलाने व्यापलेला परिसर अगदी हुबेहूब डोळ्यांसमोर साकारतो. या बेटावरील रहिवासी तर खासच. त्यांची पूर्णपणे निसर्गावर अवलंबून असणारी जीवनशैली, त्यांची अगम्य भाषा आणि हो, त्यांच्या

नरभक्षी असण्याच्या अफवा (?) शेवटी कितीही भिती वाटत असली, जीवघेणा धोका वाटत असला तरी या दोन फरार लोकांना या बेटावरच्या आदिम लोकांनाच धरून राहावं लागणार असतं. त्याप्रमाणे हे दोन फरार खलाशी त्यांच्या कल्पनेतही नसणारा असा अनपेक्षित धोकादायक प्रवास करून अखेरीस एका खोऱ्यात उतरतात. टैपी जमातीच्या खोऱ्यात. आणि ही टैपी जमात नरभक्षी म्हणून कुप्रसिद्ध असते. मग या दोन खलाश्यांना त्यांचा काय अनुभव येतो? ही सगळी कहाणी सांगण्यासाठी ते जिवंत कसे राहतात? सर्व दर्यावर्दी लोकांमध्ये दहशत निर्माण करणारे हे टैपी लोक खरचं का नरभक्षी असतात? या सगळ्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्यासाठी हे पुस्तक वाचलं पाहिजे. 'Typee' हे पुस्तक म्हणजे लेखक हर्मन मेलव्हिलचा पोलिनिशिनय बेटावर घालवलेल्या चार महिन्यांचा ऐतिहासिक लेखाजोखा आहे की, ज्यामध्ये हर्मन मेलव्हिलने या पुस्तकात सांगितलेल्या गोष्टी वास्तवात घडल्या आहेत, असा दावा केलाय. १८४६मध्ये पुस्तक प्रकाशित झाल्यानंतर पुस्तकात वर्णन केलेल्या घटनांच्या सत्यतेबद्दल संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. हे पुस्तक म्हणजे कल्पनाविलास की वास्तविकता, यावर चर्चा झडू लागल्या होत्या. अगदी हर्मन मेलव्हिल नावाची व्यक्ती खरोखरच अस्तित्वात आहे का, यावरही संशय घेतला जाऊ लागला होता. या वादळी चर्चा शिगेला पोहोचल्यावर ज्यावेळेस हर्मन मेलव्हिलची इतिहासकार म्हणून कारकीर्द धोक्यात येतेय असं वाटल्यावर, त्याने स्वतः त्याच्या डिफेन्समध्ये एक निनावी लेख प्रकाशित करण्याचे ठरवले; पण त्या आधीच या कथेची सत्यता सिद्ध करण्यासाठी लेखकाचा, त्याच्या फरार- मोहिमेतील दुसरा साथीदार, टोबी त्याच्या मदतीला आला आणि त्याच्या साहाय्याने हर्मन मेलव्हिलने 'Typee'चा उत्तरार्ध, 'The Story of Toby', 'A Sequal of 'Typee' लिहिला. त्यामुळे या पुस्तकाच्या सत्यतेविषयी उठलेला संशयाचा धुरळा खाली बसला. पुस्तकातील ख्रिश्चन मिशनरी लोकांच्या कामाविषयीच्या नकारात्मक वर्णनावर पण काही वाचक नाराज होतेच; पण लेखक आपल्या त्या मतांवर ठाम राहिला. एकूणच 'Typee'हे एका अज्ञात संस्कृतीचे छोटेखानी दर्शन घडवणारं पुस्तक ठरतं. एका आयुष्यात अनेक प्रकारच्या आयुष्याचे अनुभव देण्याची क्षमता पुस्तकात असते, मग ते अनुभव आपल्यासाठी काल्पनिक

का असेनात. त्यापैकी ‘Typee’ हे पुस्तक आहे.  या पुस्तकाचा हा अनुवाद इतका सुंदर, ओघवता झाला आहे की, आपण एक अनुवाद वाचतोय हे लक्षातच येत नाही.

**- रश्मी ससाणे**

## माझा गाव



स्वातंत्र्यपूर्व काळातील तांबड्या मातीचा सुगंध देणारी, एखादा कृष्ण-धवल मराठी चित्रपट पाहतो आहोत, याची अनुभूती देणारी, आपण त्या गावाचा एक भाग आहोत असं वाटणारी एक संवेदनशील कलाकृती. आप्पासाहेब इनामदार म्हणजेच स्वातंत्र्यपूर्व काळातील त्या गावचे प्रमुख. आपल्या गावातील मंडळींना प्रसंग पडला तर आपल्या छातीचा कोट आणि गरज पडल्यास नरडीचा घोट घ्यायला कमी करणार नाही, असं एक दमदार व्यक्तिमत्त्व. त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे वरून जरी नारळासारखे कठीण वाटत असले तरी त्यांचा स्वभाव अतिशय मृदू, गोड पाण्यासारखा आहे. सुनेला ते लेकीची माया देतात. गावात पडलेल्या ओल्या दुष्काळावेळी गावातील लोक गाव सोडून जाण्याच्या तयारीत असताना त्यांना आपल्या धान्याची कोठारे मोकळी करून देणारा, आणि तेही संपल्यावर स्वतःच्या घरातील दागिने मोडून त्याचा पैसा उभा करून गावकऱ्यांसाठी धान्य विकत घेणारा आणि गरज पडल्यास आपली जमीन विकायला मागे-पुढे न पाहणारा गावप्रमुख आपल्याला येथेच भेटतो. तात्या म्हणजे गावातील पुजारी आणि वैद्यकशास्त्राला धंदा न मानता, सेवा मानणारे उत्तम वैद्य. रामशास्त्री प्रभुणे यांचं दुसरं रूप म्हटलं तर वावगं ठरणार नाही. आप्पासाहेबांचा मोठा आधार आणि प्रत्येक संकटात आप्पासाहेबांच्या बरोबरीने तोंड देणारी व त्यातून मार्ग काढणारी व्यक्ती म्हणजे तात्या. आप्पासाहेबांना योग्य सल्ला व वेळप्रसंगी आप्पासाहेबांना सुनवायलसुद्धा मागे-पुढे न बघणारा, गावातील एकमेव माणूस म्हणजे तात्या. गावात पटकीच्या साथीवेळी तात्यांनी अहोरात्र केलेले प्रयत्न व आप्पासाहेबांनी गावचा प्रमुख या नात्याने त्यांना दिलेलं बळ. रावबाच्या हौशाच्या वेडापायी

आणि नंतर तिच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर गावात झालेली दुफळी व बिघडलेलं वातावरण, या प्रसंगावर त्यांनी केलेली मात, आदर्श सल्लागार व आदर्श गावप्रमुख कसा असावा याचं उदाहरण घालून देतात. उमा म्हणजे आप्पासाहेबांची थोरली सून, वाड्यातील जबाबदार स्त्री, आपल्या सासूच्या निधनानंतर आपल्या दिराला आईची माया देणारी आदर्श सून. आपल्या नवऱ्याचे चुकत आहे हे माहीत असूनही तोंड न उघडणारी, आपले वडील आणि सासरे यांच्यात वाद झाल्यानंतर तब्बल ११ वर्षे आपल्या माहेरचं नाव न काढणारी व माहेरचे तोंड न बघणारी. सतत आपल्या कुटुंबासोबत हिमतीने उभी राहणारी, आदर्श कारभारी सून उमा वहिनी. रावबा म्हणजे शेती आणि शिकारीची आवड असलेले पण आप्पांच्या धाकात असलेले, तरुण रक्ताची रग असणारे, थोरले वारसदार. जयवंत म्हणजे आपल्या आईच्या निधनानंतर, उमा वहिनीच्या सावलीत वाढणारे आणि वहिनीलाच आई मानणारे संवेदनशील असे आप्पासाहेबांचे धाकले वारसदार. कथानकाच्या शेवटी आप्पासाहेब दरोडेखोरांच्या गोळीबाराला बळी पडतात आणि काकी पण तापाने मरण पावतात व त्या धक्क्याने तात्याही हे जग सोडून जातात आणि जयवंत पुढच्या शिक्षणासाठी बेळगावला निघून जाण्यास तयार होतो. त्या वेळेस आपल्यालाही जयवंतसारखं वाटतं की, खरोखरच आता या गावात आपलं काही राहिलं नाही; पण उमा वहिनीसाठी व छोट्या यशवंतसाठी हा गाव सोडून आपण जाऊ नये, असं एक मन सांगत असतं. शेवटची दोन-तीन पानं वाचताना डोळ्यांतून अश्रूंच्या धारा थांबायचं नाव घेत नाहीत आणि गावच्या तांबड्या वाटेवरून मागे बघवतही नाही, 'माझ्या गावा'तून पायही निघत नाही.

**- विजय पाटील**

◆

## १६ डिसेंबर २१ ते १५ जानेवारी २०२२ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ डिसेंबर दरम्यान खास सवलत**

**१६ डिसेंबर - जॅन येगर यांचा जन्मदिन**
'मैत्री अशी आणि तशी', 'वर्क लेस, डू मोअर' या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ५४५/- । सवलत किंमत ३९९/-**

---

**१६ डिसेंबर - विजय दिवस**
'परमवीर चक्र' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १२९/-**

---

**२० डिसेंबर - मॅथ्यू ग्लास यांचा जन्मदिन**
'एन्ड गेम', 'अल्टिमेटम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५४९/-**

---

**२० डिसेंबर - प्रतिमा कुलकर्णी यांचा जन्मदिन**
'रुजवाई' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**२१ डिसेंबर - यू. आर. अनंतमूर्ती यांचा जन्मदिन**
'संस्कार', 'अवस्था' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**२३ डिसेंबर - किसान दिवस**
'आधुनिक द्राक्ष लागवड', 'विपुलाच सृष्टी', 'केल्याने होत आहे रे', 'सुंदर आपली फुलबाग', 'सुंदर आपली फळबाग', 'शेती करू फायद्याची', 'बोन्साय', 'घरातील बाग', 'छंद बागेचा', 'कॉर्पोरेटला रामराम शेतीला सलाम' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १७७५/- । सवलत किंमत १२१९/-**

---

**२४ डिसेंबर - मधुवंती सप्रे यांचा जन्मदिन**

'लोकल माझी सखी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ८९/-**

**२४ डिसेंबर - सुरेशचंद्र नाडकर्णी यांचा जन्मदिन**
'गज़ल', 'नॉस्त्रादेमसची भविष्यवाणी', 'पृथ्वीवर माणूस उपराच', 'अज्ञाताचे विज्ञान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ४९९/-**

**२४ डिसेंबर - भारतीय ग्राहक दिन**
'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या सर्व पुस्तकांवर (प्रत्येकी १ प्रत)
४०% सवलत.
ही सवलत नेट १५००/- व अधिकच्या खरेदीवर लागू.
**(ही सवलत फक्त २४ डिसेंबर या एक दिवसासाठी आहे.)**

**२५ डिसेंबर - प्रज्ञा ओक यांचा जन्मदिन**
'बुक मार्क' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत १३९/-**

**२५ डिसेंबर - ख्रिसमस**
बालसाहित्याच्या **१५००च्या** खरेदीवर ४०% सूट
**(ही सवलत फक्त २५ व २६ डिसेंबर या दोन दिवसांसाठी आहे.)**

**२८ डिसेंबर - बाबा आमटे यांचा जन्मदिन**
'अमरगीत' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**२८ डिसेंबर - जॉन ग्रे यांचा जन्मदिन**
' 'स'सुखाचा', 'तो आणि ती', 'तुला आठवताना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ८९०/- । सवलत किंमत ६०२/-**

**२८ डिसेंबर - डेव्हिड ॲलन यांचा जन्मदिन**
'गेटिंग थिंग्ज डन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

**२९ डिसेंबर - भावेश भाटिया यांचा जन्मदिन**
'रुक जाना नही' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २२९/-**

**३० डिसेंबर - जयसिंगराव पवार यांचा जन्मदिन**
'आमच्या इतिहासाचा शोध आणि बोध', 'छत्रपती संभाजी : एक चिकित्सा', 'मराठेशाहीचे अंतरंग', 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे', 'शिवछत्रपती एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास', 'समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती', 'क्रांतिसिंह नाना पाटील', 'वेध अमुच्या इतिहासाचा', 'छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ५४१५/- । सवलत किंमत ३८४९/-**

**३१ डिसेंबर - चान्स मेगन यांचा जन्मदिन**
'द स्पिरिच्युअॅलिस्ट' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

**खालील संचांवर १ते १५ जानेवारी दरम्यान खास सवलत**

**१ जानेवारी - मायकेल गेट्स गिल यांचा जन्मदिन**
'हाऊ स्टारबक्स सेव्हड माय लाइफ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१९/-**

**१ जानेवारी - तान त्वान एंग यांचा जन्मदिन**
'द गिफ्ट ऑफ रेन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २२९/-**

**१ जानेवारी - पॉल कार्सन यांचा जन्मदिन**
'बिट्रेयल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

**१ जानेवारी - ॲनी बरोज यांचा जन्मदिन**
‘गर्नसी वाचक मंडळ’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १२९/-**

---

**१ जानेवारी - नादिया मुराद यांचा जन्मदिन**
‘द लास्ट गर्ल’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७९/-**

---

**१ जानेवारी - सॅम ख्रिस्टर यांचा जन्मदिन**
‘द स्टोनहेंज लेगसी’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१९/-**

---

**३ जानेवारी - ग्रेटा थुनबर्ग यांचा जन्मदिन**
‘ग्रेटाची गोष्ट’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १२५/- । सवलत किंमत ८९/-**

---

**३ जानेवारी - जसवंत सिंग यांचा जन्मदिन**
‘ए कॉल टू ऑनर’, ‘जिना’ या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ४७९/-**

---

**३ जानेवारी - राजेंद्र खेर यांचा जन्मदिन**
‘बिंदू सरोवर’, ‘उदयन’ या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत ६४५/- । सवलत किंमत ४४९/-**

---

**३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती**
‘महात्मा (जोतीराव फुले)’, ‘मी मलाला’, ‘स्टोन्स इन्टू स्कूल’, ‘थ्री कप्स ऑफ टी’, ‘माय नेम इज परवाना’ या पुस्तकांवर विशेष सवलत
**मूळ किंमत १६८५/- । सवलत किंमत ९९९/-**

---

**४ जानेवारी - कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी यांचा जन्मदिन**
‘मराठी भाषा उद्गम व विकास’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत १९९/-**

**७ जानेवारी - शोभा डे यांचा जन्मदिन**
'सिलेक्टिव्ह मेमरी', 'स्पीड पोस्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ७६०/- । सवलत किंमत ५०९/-**

---

**८ जानेवारी - स्टीफन हॉकिंग यांचा जन्मदिन**
'जॉर्ज अ‍ॅन्ड द बिग बँग', 'जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट', 'जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४८५/- । सवलत किंमत १०२९/-**

---

**८ जानेवारी - मार्क व्हिक्टर हॅन्सन यांचा जन्मदिन**
'चिकन सूप फॉर द सिस्टर्स सोल', 'चिकन सूप फॉर द ग्रँड पेरेंट्स सोल भाग १', 'चिकन सूप फॉर द सोल', 'चिकन सूप फॉर द सोल अस्थमा', 'चिकन सूप फॉर द सोल बॅक पेन', 'चिकन सूप फॉर द सोल फॅमिली मॅटर भाग १', 'चिकन सूप फॉर द सोल फॅमिली मॅटर भाग २', 'चिकन सूप फॉर द सोल भाग २', 'चिकन सूप फॉर द सोल भाग ३', 'चिकन सूप फॉर द सोल भाग ५', 'चिकन सूप फॉर द सोल भाग ६', 'चिकन सूप फॉर द सोल टफ टाइम्स, टफ पीपल', 'चिकन सूप फॉर द सोल टू लव्ह भाग १', 'चिकन सूप फॉर द सोल टू लव्ह भाग २', 'चिकन सूप फॉर द टीनएज सोल भाग ३' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३२२५/- । सवलत किंमत २२१९/-**

---

**९ जानेवारी - विल्बर स्मिथ यांचा जन्मदिन**
'द सेव्हन्थ स्क्रोल' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत २७९/-**

---

**९ जानेवारी - शोभा चित्रे यांचा जन्मदिन**
'एक दिवस', 'पानगळीच्या आठवणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४३०/- । सवलत किंमत २४९/-**

---

**१० जानेवारी - निरंजन घाटे यांचा जन्मदिन**
'आल्फ्रेड रसेल वॅलेस', 'आपल्या पूर्वजांचे तंत्रज्ञान', 'आपल्या पूर्वजांचे विज्ञान', 'असे घडले सहस्रक', 'असे शास्त्रज्ञ असे संशोधन', 'ज्ञानदीप', 'फार फार वर्षांपूर्वी', 'जिज्ञासापूर्ती', 'ज्याचं करावं भलं', 'पर्यावरण प्रदूषण', 'रोबॉट फिक्सिंग', 'शास्त्रज्ञांचे जग', 'स्वप्नचौर्य', 'तरुणांनो होशियार',

‘वसुंधरा’, ‘वेध पर्यावरणाचा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३४७०/- । सवलत किंमत २११९/-**

**११ जानेवारी - अनू अगरवाल यांचा जन्मदिन**
‘अनू’प या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७९/-**

**११ जानेवारी - वि. स. खांडेकर यांचा जन्मदिन**
एकूण ११९ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६,८१५/- । सवलत किंमत १०,६९९/-**

**१२ जानेवारी - स्वामी विवेकानंद जयंती व जागतिक युवा दिन**
‘आधुनिक भारताचे प्रेषित स्वामी विवेकानंद’, ‘क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता’, ‘चिकन सूप टीनएज सोल’, ‘चिकन सूप टीनएज सोल भाग २’, ‘चिकन सूप टीन एज सोल भाग ३’, ‘मैत्री अशी आणि तशी’, ‘स्वामी विवेकानंद’, ‘टीनएजर्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**मूळ किंमत १९५०/- । सवलत किंमत ११४९/-**

**१२ जानेवारी - मृणालिनी गडकरी यांचा जन्मदिन**
‘क्रांतियोगिनी भगिनी निवेदिता’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३०९/-**

**१४ जानेवारी - डेव्हिड कर्कपॅट्रिक यांचा जन्मदिन**
‘द फेसबुक इफेक्ट’ या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २२९/-**

**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**

आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.

**author@mehtapublishinghouse.com**

## नवीन संहिता... नवा आशय...

**प्राणी-पक्षी-निसर्ग यातून फुलत गेलेल्या गोष्टी...**
**जोडीला रंगीबेरंगी आणि मनाला मोहवणारी चित्रं...**
**राजीव तांबे यांच्या खास शैलीतील बालकथा**




# अजब डोंगर
# राजाचा घोडा
# फुले फुलली

**आणि इतर कथा**




लेखक
**राजीव तांबे**







पृष्ठसंख्या : प्रत्येकी ९६
किंमत : प्रत्येकी ₹१९५
पोस्टेज अतिरिक्त

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 11/12/2021 Posting Date : 11/12/2021

## नवीन संहिता... नवा आशय...






















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,